




श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिकृत नियतकालिक

# साईलीला

स्थापना १९२३ | चालू वर्ष ९७ | नूतन नोंदणी वर्ष २० | अंक २ | मार्च-एप्रिल २०२० | पाने ३६ | ₹ ८/-



## लढा कोरोनाशी



केवळ शुद्धज्ञानमूर्ती
व्हावया आत्यंतिक सौख्यपूर्ती
नाहीं तुझिया पायांपरती
आणिक गति आम्हांतें

- श्री साईसच्चरित, (ओवी १०, अध्याय २२)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,
शिर्डीचे अधिकृत नियतकालिक

# साईलीला

स्थापना १९२३ । चालू वर्ष ९७
नूतन नोंदणी वर्ष २० । अंक २
मार्च-एप्रिल २०२० । पाने ३६ । ₹ ८/-

■ संपादक
अरुण किशोर डोंगरे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

■ कार्यकारी संपादक
भगवान दातार
ई-मेल : editor.saileela@gmail.com

■ मुखपृष्ठ आणि मांडणी
**इनोव्हेटिव्ह आयडिया, पुणे.**
ई-मेल : innovativeideaads@gmail.com
■ **कार्यालय :** 'साईनिकेतन', ८०४ बी,
डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : (०२२) २४१६६५५६
फॅक्स : (०२२) २४१५०७९
ई-मेल : saidadar@sai.org.in
■ **शिर्डी कार्यालय** : मु. पो. : शिर्डी - ४२३ १०९,
ता. : राहाता, जि. : अहमदनगर.
दूरध्वनी : (०२४२३) २५८५००
फॅक्स : (०२४२३) २५८७७०
ई-मेल: saibaba@shrisaibabasansthan.org,
saibaba@sai.org.in
■ टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : ₹ ५०/-
■ सर्वसाधारण अंकाचे मूल्य : ₹ ८/-
■ श्री साईपुण्यतिथी विशेषांकाचे मूल्य : ₹ १५/-
■ मुद्रण : गणेश आर्ट प्रिंटर्स, एम. आर. ट्रेड सेंटर,
शॉप नं. ७, वाडिया पार्क, अहमदनगर - ४१४००१
मो. ९८५०२३०४५५, ०२४१-२५५०५५८
■ प्रकाशक व मुद्रक अरुण किशोर डोंगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक गणेश आर्ट प्रिंटर्स, एम. आर. ट्रेड सेंटर, शॉप नं. ७, वाडिया पार्क, अहमदनगर येथे छापून 'साईनिकेतन', ८०४ - बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले. या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्वप्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.

**इंटरनेट आवृत्ती :**
**URL:http://www.shrisaibabasansthan.org**



**लढा कोरोनाशी ■ ७**



**पुनश्च हरि: ॐ**
: भगवान दातार ■ १२




**तेथे कर माझे जुळती**
: मुग्धा दिवाडकर ■ २१



**गुरुवीण कोण दाखवील वाट?**
: मोहन यादव ■ ३०

## अन्य विशेष

- **'साईचरणी माझा फोटो'** ■ १४
- **साईसेवक भक्तीचा अनोखा आविष्कार** ■ १५
- **साई प्रश्नमंजुषा** ■ १८
- **शहाणे करुन सोडावे**
  : सोहम आपटे ■ १९
- **काव्यसरिता** ■ २४
- **मार्ग तयाचा तोच दावील...** ■ २५
- **श्रीरामनवमी उत्सव २०२०** ■ २८



# संपादकीय

सुमारे शंभर दिवसांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर साईलीलाचा हा अंक आपल्या हाती देताना आमचं मन अक्षरशः भरून आलं आहे. गेले शंभर दिवस आपण करोनाच्या संकटाशी झुंजत आहोत. या भयंकर आपत्तीशी लढण्याचा मार्ग अद्यापही आपणास सापडलेला नाही. एकप्रकारे सगळं जगच या रोगापुढे हतबल झालं आहे. साईंवरील अविचल निष्ठा आणि अथक प्रयत्नातून आपण यावर नक्की मात करू.

साईलीलाचा हा अंक आपल्या हाती देताना हीच भावना मनात आहे. साईलीलाच्या जानेवारी-फेब्रुवारीच्या अंकाची छपाई झाली, पण लॉकडाऊनमुळे त्याचं वितरण झालं नाही. तोही अंक वाचकांना यथावकाश मिळेल. लॉकडाऊनशी चालू असलेल्या लढ्यात संस्थानचा मोलाचा वाटा आहे. आर्थिक मदत, गरजूंना अन्नवाटप, मंदिरातील प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत संस्थानने आपली जबाबदारी कसोशीने निभावली आहे. याची सविस्तर माहिती आपणास या अंकात वाचायला मिळेलच. त्याबरोबर आपली नेहमीची लोकप्रिय सदरं आहेतच. या अंकाचं मुखपृष्ठही संकटाची भीषणता दाखवून देतानाच त्यावर मात करण्याची उमेद जागवणारं आहे. आत्मविश्वासाच्या प्रसन्न लहरी निर्माण करणारं हे चित्र तुम्हाला नक्कीच आवडेल.

भाविकांनीही या काळात संस्थानला चांगली साथ दिली. शासनाच्या आदेशानुसार मंदिर दर्शनासाठी बंद करण्यात आलं. भाविकांनीही ती बंदी मनोमन स्वीकारली. शेवटी परमेश्वर हा प्रत्येकाच्या मनात असतो. आपल्या मनात असलेल्या साईश्रध्देमुळेच आपली लढण्याची जिद्द कायम आहे.


करोनाच्या लढ्यात अनेक साईभक्त व्यक्तिगतरीत्या आणि त्यांच्या त्यांच्या संस्थांमार्फत सहभागी झाले असतील. अशा सर्वांनी आपले अनुभव साईलीलासाठी पाठवावेत, आम्ही ते आवर्जून प्रसिध्द करू.

संकटकाळात भक्तांच्या मदतीसाठी साई या ना त्या रूपात नेहमीच धावून जातात असा अनेकांचा अनुभव आहे. करोनाच्या काळात साईकृपेचा असा प्रत्यय तुम्हाला आला असेल तर त्याविषयीचे तुमचे अनुभव पुढील अंकासाठी जरूर पाठवावेत.

या संकटाशी मुकाबला करताना साई तुमच्या पाठीशी सदैव असतील असा विश्वास आहे.

- कार्यकारी संपादक





# पुनश्च हरि: ॐ

सर्व जग आज करोना महामारीशी लढत आहे. या रोगामुळे संपूर्ण जगावर एक भीतीचं सावट निर्माण झालं आहे. मृतांची आणि बाधितांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. लोकांचे उद्योग थंडावले असून सगळा देश आर्थिक पेचप्रसंगाच्या उंबरठ्यावर उभा आहे. पण याही स्थितीत आपल्याला हातपाय गाळून चालणार नाही. संकट मोठं असलं तरी त्याचा सामनाही तितक्याच हिंमतीने करायला हवा. पुनश्च हरि: ॐ म्हणत रोखलं गेलेलं जीवनचक्र आपण पुन्हा सुरू करायला हवं. कनवाळू साईबाबांनी त्यासाठी हिंमत आणि प्रेरणा द्यावी अशीच प्रार्थना आज प्रत्येक साईभक्त करत असेल.


हा लेख लिहीत असतांना करोनाच्या संकटाला देशात १०० दिवस पूर्ण झाले आहेत. करोनाची ही भीषण साथ साऱ्या जगात थैमान घालत आहे. भारतातील बाधितांची संख्या सात लाखांकडे झेपावत असून मृतांच्या संख्येनेही २० हजारांचा टप्पा ओलांडला आहे.

२०20 या नव्या वर्षाची सुरुवात झाली आणि करोनाचे हे वादळ जगात घोंगावू लागले. चीनच्या वुहान शहरात या रोगाची सुरुवात झाली आणि पाहता पाहता या महामारीने सगळ्या जगाला व्यापून टाकले. ज्याची लक्षणे नीट दिसत नाहीत आणि ज्यावर कुठलेही औषध दृष्टिपथात नाही अशा या महामारीपुढे सगळं जग हतबल झालं आहे. जगातल्या अनेक देशांप्रमाणे भारतातही लॉकडाऊन करण्यात आला आणि आता

**भगवान दातार**

निर्बंध शिथिल होत असले तरी रोगाची संहारकता थांबलेली नाही. उलट त्याचा प्रस्फोट होण्याची भीती आहे.

लॉकडाऊनच्या काळात इतर व्यवहारांबरोबर देशातील मंदिरे आणि धार्मिक स्थळेही बंद आहेत. शिर्डीच्या साई मंदिरातही प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने अंमलात आणण्यात आल्या. मंदिर भाविकांसाठी बंद करण्यात आले. प्रसादालय, निवास किंवा शैक्षणिक संस्थाही बंद करण्यात आल्या. भक्तांचा महापूर थांबला आणि अहोरात्र चालणारे सेवेचे उपक्रम थंडावले.



हा मजकूर लिहीत असेपर्यंत मंदिर दर्शनासाठी खुले झालेले नाही. केंव्हा होईल ते सांगता येत नाही. या सगळ्या परिस्थितीत साईंची कृपा हा एकच दिलासा भाविकांच्या मनात आहे. बाबांच्या दर्शनाला जाता येत नसले तरी त्यांचे जगावर मायेची पखरण करणारे तेजस्वी नेत्र सगळ्यांकडे बघत आहेत. ती साईमाउली भक्तांची काळजी घेत आहे आणि ते चैतन्य सर्वांना संकटावर मात करण्याची प्रेरणा देत आहे असाच भाव प्रत्येक भक्ताच्या मनात आहे. 'जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव' असं आपण बाबांच्या आरतीत म्हणतो. बाबांवर श्रध्दा असणाऱ्या अनेकांना त्यांच्या कृपेचा अनुभव या काळात आला असेल. बाबांचं मंदिर बंद असलं तरी बाबांचा वास प्रत्येक भक्ताच्या मनात असतो. 'तुमचा मी भार वाहीन सर्वथा' असं वचन बाबांनी भक्तांना दिलेलं आहे. आजही बाबा भक्तांच्या पाठीशी आहेत हा विश्वासच आपल्याला तारून नेईल.

बाबांच्या चरित्रातच याविषयीचे अनेक दाखले आहेत. श्री साईसच्चरिताच्या अगदी पहिल्याच अध्यायात गावात महामारी आल्यानंतर बाबांनी ती कशी रोखली याचं उदाहरण आहे. बाबांनी गावच्या शिवेवर पीठ टाकलं आणि महामारी गावाबाहेरच रोखून धरली असं त्यात म्हटलं आहे.

**पीठ टाकिलें ओढियाकांठीं,**
**तेथुनी रोगास लागली ओहोटी।**
**दुर्दिन गेले उठाउठी,**
**हे हातोटी बाबांची।।**
**गांवांत होती मरीची साथ,**
**करिती हा तोडगा साईनाथ।**
**झाली रोगाची वाताहात,**
**गांवास शांतत्व लाधलें।।**

असे त्या अध्यायात म्हटले आहे. संतांच्या कृती या अगम्य असल्या तरी सूचक असतात. त्यांचा अंदाज येत नसला तरी मानवाचं कल्याण हाच त्या कृतीमागचा उद्देश असतो.

सध्याच्या संकटकाळातही पुनश्च हरी ओम म्हणतांना हाच विश्वास आपणा सर्वांच्या मनात असायला हवा. संकट कितीही मोठं असलं तरी त्यापुढे हातपाय गाळणं हे पुरुषार्थाचं लक्षण नाही. संकटावर मात करून हळूहळू सगळे व्यवहार पुन्हा सुरू करावे लागतील. त्यासाठीच हे पुनश्च हरि: ॐ आहे.

१३० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशात लॉकडाऊन अंमलात आणणे ही अशक्यप्राय गोष्ट होती. एरवी आपले लोक म्हणजे गबाळे, बेशिस्त आणि कायदा न पाळणारे असं आपण नेहमी म्हणत असतो. अजूनही आपल्या देशात अशिक्षितांचं प्रमाण खूप आहे. अशा स्थितीत संपूर्ण देशाचे व्यवहार रोखून धरणं केवळ अशक्य मानलं जात होतं. पण खंबीर केंद्रीय नेतृत्व आणि सर्व राज्यांनी त्यांना दिलेली साथ यामुळे हे शक्य झालं. पण त्याहीपेक्षा याचं श्रेय इथल्या जनतेला दिलं पाहिजे. कोणी काहीही म्हटलं तरी भारतातील बहुसंख्य लोक श्रध्दावान आहेत. देव, देश, धर्म आणि मानवकल्याण यावर त्यांची अविचल निष्ठा आहे. त्यामुळेच अशा राष्ट्रीय किंवा वैश्विक आपत्तीच्या काळात अतूट ऐक्याची आणि निर्धाराची भावना प्रत्येकाच्या मनात सहजपणे तयार होते.

प्रत्यक्ष संकटाशी आपण मानवी प्रयत्नातून झुंजत असतोच; पण त्यामागे परमेश्वरी कृपेचा दिलासा असेल तर एक वेगळीच उमेद त्यातून निर्माण होते. ती उमेदच संकटाशी झगडण्याची आणि त्यावर मात करण्याची शक्ती देत असते.

त्या कृपेच्या आधारानेच या संकटाशी मुकाबला करत थांबलेलं जीवनचक्र पुन्हा सुरू करण्यासाठी पुनश्च हरि ॐ चा हा मंत्र. ज्यांनी हा मंत्र प्रथम वापरला त्या लोकमान्य टिळकांच्या सामर्थ्याचं तेज या मंत्राला लाभलं आहे. आपले प्रयत्न आणि साईंची कृपा यामुळे निर्माण झालेलं कवच आपलं रक्षण करेल असा विश्वास वाटतो.

■■■


## 'साईलीला'च्या वर्गणीसाठी

संस्थान प्रकाशित 'साईलीला' द्वैमासिक नियतकालिकाच्या सर्वसाधारण सभासदांनी त्यांची पुढील वर्गणी, चालू वर्गणी संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर भरावी. नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांना कोणत्याही दिवशी वर्गणी भरता येईल; मात्र त्यांना वर्गणी भरल्यानंतर दोन महिन्यांनी अंक येणे सुरू हाईल.
वर्गणी प्रत्यक्ष/मनीऑर्डर/धनादेश (चेक)/धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) द्वारा भरता येईल. धनादेश (चेक)/धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi या नावे असावा.
**मुंबई कार्यालय :** 'साईलीला', ८०४ बी, साईनिकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर (पूर्व), मुंबई – ४०० ०१४.
**शिर्डी कार्यालय :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, मु. पो. शिर्डी – ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर.
इतर ठिकाणाहून थेट वर्गणी भरण्यासाठी संस्थानच्या **online.sai.org.in** या संकेतस्थळावरही सुविधा उपलब्ध आहे.



# लढा कोरोनाशी

देशात करोनाने थैमान घालायला प्रारंभ केला आणि ते आवरण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी कंबर कसली. जनसंपर्कातून करोना फैलावतो हे लक्षात घेऊन अशी ठिकाणे सील करण्यात आली. अन्य मंदिरांबरोबरच शिर्डीचं साईमंदिरही बंद ठेवण्यात आलं. या काळात संस्थानच्या वतीने स्वच्छता मोहीम तर राबवण्यात आलीच, पण मोठ्या प्रमाणावर मदतही करण्यात आली. कोणत्याही आपत्तीच्या प्रसंगी मदतीसाठी धावून जाण्याचा बाणा संस्थानने याहीवेळी कायम राखला.

देशात करोनाचं थैमान सुरु होण्यापूर्वीच शिर्डीच्या साईमंदिरात स्वच्छतेची मोहीम हाती घेण्यात आली होती. नव्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या विशेष प्रयत्नातून सुरू झालेल्या या मोहिमेचा पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या वेळी खूप उपयोग झाला.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना**

श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. अरुण डोंगरे (भा.प्र.से.) यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी सूत्रे हाती घेतली. लगेच मंदिर व मंदिरपरिसर, दर्शनरांग आदी ठिकाणी भेट देवून स्वच्छतेच्या कामाला प्रथम प्राधान्य देवून समाधी, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान आदि मंदिरे व दर्शनरांगेसह सर्व परिसर स्वच्छ करण्याचे आदेश त्यांनी दिले. पहिल्याच दिवशी श्री. डोंगरे यांनी संस्थानच्या सर्व विभागांना स्वच्छतेविषयीच्या सूचना दिल्या. त्यानंतर श्री साईप्रसादालयात समक्ष जाऊन सामान्य भक्तांप्रमाणे प्रसादहॉलमध्ये प्रसादभोजन घेतले. अशाप्रकारे सामान्य भक्ता प्रमाणे प्रसादहॉलमध्ये प्रसादभोजन घेणारे संस्थानच्या इतिहासातील हे पहिले अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. श्री. डोंगरे यांना स्वच्छतेची



आवड असल्याचा संदेश संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये पसरला. त्यानुसार संस्थानच्या सर्वच विभागांनी स्वच्छतेची कामे हाती घेतली.

श्री. डोंगरे यांनी कोरोना व्हायरसचे थैमान सुरू होण्यापूर्वीच संस्थानच्या सर्व विभागांना स्वच्छतेबाबत सूचना दिल्या. त्यांच्या सूचनेनुसार संपूर्ण मंदिरपरिसर व दर्शनरांगा लिक्वीड सोपने स्वच्छ करण्यात आल्या, दर्शनरांगेतील स्टिल रेलींग, दरवाजे व भिंती सोडियम हायपोक्लोराईड आणि डायक्लोराईड या जंतुनाशकांनी निर्जंतुक करण्यात आल्या. तसेच संपूर्ण मंदिरपरिसरात डेल्टाच मेथ्रीन हे कीटकनाशक औषध वापरुन धूरफवारणी करण्यात आली. सर्व प्रवेशव्दारे, मंदिरपरिसर व दर्शनरांगांमध्ये विविध ठिकाणी साईभक्तांना हात निर्जंतुक करण्यासाठी सॅनिटायझर व लिक्वीड हॅन्डवॉश ठेवण्यात आले. मंदिरमहाव्दारात (नंदी गेट) प्रत्येक साईभक्तांच्या हातावर सॅनिटायझर लावण्यात येत होते. तसेच सर्वच प्रवेशव्दारांमधून साईभक्तांना, तसेच कर्मचाऱ्यांना प्रवेश देण्यापूर्वी सॅनिटायझरचा वापर केला जात होता. दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची तापमानाची तपासणी करण्यासाठी संस्थानचे विश्वस्त बिपीनदादा कोल्हे यांनी दिनांक ११ मार्च रोजी ११ डिजिटल नॉन कॉन्टॅक्ट थर्मामीटर देणगी स्वरूपात दिले. श्री. डोंगरे यांनी या थर्मामीटरचा वापर करण्याचा आदेश दिला. त्याव्दारे प्रत्येकाचे तापमान तपासूनच मंदिरात प्रवेश दिला जात असे. श्री साईबाबा संस्थान अशाप्रकारची प्राथमिक तपासणी करत असल्याचे पाहून सिध्दीविनायक देवस्थान व इतर देवस्थानांनी याबाबत विचारणा करून संस्थानचे कौतुक केले आणि याप्रकारे आम्हालाही मार्गदर्शन करावे अशी विनंती केली.

**अपत्ती निवारण दलाचे मार्गदर्शन**

तसेच, करोना व्हायरसपासून होणाऱ्या आजाराविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरिता श्री साईबाबा संस्थानची तदर्थ समिती व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना करोना व्हायरसबाबत व निर्मूलनासाठी विशेष माहिती होण्याकरिता दिनांक ०७ मार्च २०२० रोजी राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, नवी दिल्ली (नॅशनल डिझास्टार रिस्पॉन्स फोर्स) (NDRF) यांच्या वतीने मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, नवी दिल्लीच्या वतीने कमांडर ए. के. झेना व डॉ. राहुल वाघमारे यांनी कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करुन प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वापरण्यात येणाऱ्या साहित्यांची माहिती देऊन प्रात्यक्षिक दाखविले. या आयोजित केलेल्या शिबिरातील प्रशिक्षण व मार्गदर्शनामुळे संस्थान प्रशासन व कर्मचारी करोना व्हायरसपासून होणाऱ्या आजाराविरुध्द उपाययोजनेकरिता सज्ज झालेले आहेत.

**विलगीकरण कक्ष**

संस्थानच्या वतीने करोना व्हायरसपासून होणाऱ्या आजाराविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात आयसोलेशन वॉर्ड तयार करण्यात आला असून या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आलेले आहेत. तसेच जनजागृतीसाठी सदर व्हायरसमुळे होणाऱ्या आजाराची लक्षणे व आजार होवू नये म्हणून प्रतिबंधात्मक व खबरदारीचा उपाय म्हणून माहितीचे फलक मंदिरपरिसर, सर्व भक्तनिवासस्थाने, श्री साईप्रसादालय, दोन्ही रुग्णालये, इतर आवश्यक त्या ठिकाणी तसेच रेल्वेस्टेशन, विमानतळ आदी ठिकाणी लावण्यात आलेले आहेत. तसेच मंदिरपरिसरात असलेली स्वच्छता गृहे, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे व आवश्यक त्या ठिकाणी साईभक्तांना लिक्वीड सोपसह हात धुण्याची व आवश्यक त्या ठिकाणी सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आली होती.

श्री क्षेत्र शिर्डी हे भाविकांचे श्रध्दास्थान असून देशाच्या व जगाच्या कानाकोपऱ्यातून मोठया संख्येने भाविक

# मुख्यमंत्रीनिधीस संस्थानतर्फे ५१ कोटी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डीच्या वतीने देश व राज्यावर आलेल्या करोना व्हायरसच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी ५१ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय संस्थानच्या तदर्थ समितीने घेतला असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी दिली.

श्री. डोंगरे म्हणाले, जगभरात व देशभरात थैमान घालणाऱ्या करोना व्हायरसच्या मुकाबल्यास तोंड देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार सज्ज झाले आहे. याच पार्श्वभूमीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने या संकटाचा मुकाबला करण्यासाठी ५१ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा निर्णय संस्थानच्या तदर्थ समितीने घेतला.

संस्थानच्या वतीने यापूर्वीही राष्ट्रीय व नैसर्गिक आपत्तीत वेळोवेळी मदत केलेली आहे. यामध्ये केरळमधील पुरामुळे आपदग्रस्त झालेल्या व पूरग्रस्तांसाठी ५ कोटी, राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी १२ कोटी, तसेच पुलवामा येथील शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांच्या मदतीकरिता २.५१ कोटी रुपये निधी देण्यात आलेला असल्याचेही श्री. डोंगरे यांनी सांगितले. याप्रसंगी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र ठाकरे, मुख्य लेखाधिकारी बाबासाहेब घोरपडे हे उपस्थित होते.

■■■

श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनाकरिता शिर्डी येथे येत असतात. संस्थानच्या वतीने वर्षभरात विविध उत्सव, सण आयोजित करून ते मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. या उत्सवांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भाविकांची होणारी गर्दी! त्यात विविध ठिकाणांहून पालखीसमवेत आलेले पदयात्री, विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम होत असतातच. यामध्ये श्रीरामनवमी उत्सव जवळ आला असताना करोना व्हायरससारखे संकट आले. या करोना व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये म्हणून राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना केलेल्या होत्या. यामध्ये धार्मिक स्थळे, सामाजिक या ठिकाणी गर्दी करू नये असे निर्देश देण्यात आलेले होते. त्याच पार्श्वभूमीवर दिनांक १७ मार्च २०२० पासून श्री साईबाबा समाधी मंदिर भाविकांना दर्शनाकरिता बंद ठेवण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या तदर्थ समितीच्या वतीने घेण्यात आला. या निर्णयाला सर्व स्तरावर पाठिंबा मिळाला.

संस्थानचे साईप्रसादालय व भक्तनिवासस्थानेही बंद ठेवण्यात आली. संकेतस्थळावरून ऑनलाईन दर्शन पासेस व आगाऊ निवासी खोल्या बुकिंग बंद करण्यात आले. तसेच दिनांक १ एप्रिल ते दिनांक ३ एप्रिल २०२० या काळात साजरा करण्यात येणारा श्रीरामनवमी सार्वजनिक उत्सव रद्द करण्यात आला. हा सार्वजनिक उत्सव रद्द झाल्यामुळे पालख्या घेऊन शिर्डी येथे येऊ नये यासाठी संस्थानच्या वतीने पालखी पदाधिकाऱ्यांना पत्र पाठवून आवाहन करण्यात आले. मंदिर बंदबाबतची माहिती साईभक्तांना ई-मेल, दूरध्वनी, संकेतस्थळ व प्रसार माध्यमांद्वारे देण्यात आली होती. याची माहिती होताच साईभक्तांनी नियोजित विमान प्रवास, रेल्वेप्रवासाची तिकिटे रद्द करून सहकार्य केले. संस्थानमार्फत साईभक्तांना उपलब्ध सुविधा बंद करण्यात आल्याने, साईभक्तांनी सदर कालावधीदरम्यान ऑनलाईन पध्दतीने आरक्षित केलेल्या सुविधेचे (दर्शन/आरती पासेस, रुम बुकिंग व सत्यनारायण आणि अभिषेक पूजा) लॉकडाऊन संपल्यानंतर पुढील ४ महिन्यांत, परंतु श्री गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तारखा वगळून साईभक्तांच्या मागणीनुसार फेर नियोजन केल्यास ही सुविधा त्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अथवा त्यांचे फेरनियोजन नसल्यास संस्थानखाती जमा असलेली रक्कम परत करण्याबाबतचा निर्णय तदर्थ समितीने घेतला आहे.

**अन्नवाटप**

श्री साईबाबा स्वतः भिक्षा मागून गोरगरिबांना जेवण देत असत. तसेच बाबा नेहमी भुकेलेल्यांना अन्नदान करण्यास सांगत. श्री साईबाबांच्या याच शिकवणुकीनुसार संस्थानच्या श्री

साईप्रसादालयाच्या वतीने दिनांक १८ मार्च २020 पासून दररोज सुमारे १८00 ते २000 व्यक्तींकरिता जेवण तयार केले जात होते. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण व नातेवाईक, शिर्डीपरिसरातील अनाथश्रम, वृध्दाश्रम, मूकबधिर विद्यालय, बंदोबस्तावरील पोलीस कर्मचारी, शिर्डीजवळील निघोज येथील पालखी निवारा येथे सुमारे २५0 निराधार व गरजूंना आणि संस्थानच्या व शासकीय कार्यालयातील संरक्षण, स्वच्छता व इतर कार्यरत कर्मचाऱ्यांना दोन्ही वेळचे भोजन निःशुल्क पुरविण्यात येत आहे. जेवणामध्ये भाजी, वरण, भात, चपातीचा समावेश आहे. त्याचप्रमाणे कोपरगांव परिसरातील मतिमंद, अनाथ मुलं, दवाखान्यातील रुग्ण व त्यांचे नातेवाईक, वृद्ध यांना दररोज अंदाजे ५000 ते ७000 अन्नपाकिटे पुरविण्यात येत आहेत.

राज्यासह अहमदनगर जिल्ह्यातील करोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेवून संस्थानच्या वतीने दिनांक ५ एप्रिल रोजी श्री साईधर्मशाळा भक्तनिवास येथे इमारत क्र. ए विंग, तळमजल्यावर ८ हॉलमध्ये प्रत्येकी १0 ते १२ खाटांचे असे एकूण १00 खाटांचे विलगीकरण केंद्र तयार करण्यात आले असून या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. करोनाग्रस्तांची संख्या सातत्याने वाढत असून बाजारात सॅनिटायझरचा तुटवडा भासत आहे. ही बाब लक्षात घेवून आमदार श्री. रोहित पवार यांनी श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता १00 लिटर सॅनिटायझर देणगी स्वरूपात दिले.

**स्वच्छतेला प्राधान्य**

करोना व्हायरसचा प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संस्थानच्या सर्व विभागांनी स्वच्छतेची कामे मोठया प्रमाणात हाती घेतली आहेत.

संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे यांनी समाधी मंदिर व मंदिरपरिसरात समक्ष भेट देवून स्वच्छताविषयक कामाचा आढावा घेतला. याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र ठाकरे व सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. श्री साईबाबा समाधी मंदिर कळसापासून धुवून स्वच्छ करण्यात आले. तसेच व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान, हनुमान मंदिर, गणपती, शनिदेव व महादेव मंदिरांसह दर्शनरांग, प्रशासकीय इमारत, पिंपळवाडी रोडलगतचे शेड, १६ गुंठेतील सभामंडप, लेंडीबाग ही सर्व ठिकाणे धुवून स्वच्छ करण्यात आली. गर्दी नसल्यामुळे ही कार्यवाही पहिल्यांदाच होत असून या ठिकाणी विद्युत, बांधकाम, पाणीपुरवठा व मेकॅनिकल आदी विभागांनी आपल्याशी संबंधित मेंटेनन्सची कामे हाती घेतली आहेत.

संस्थानच्या साई आश्रम या सर्वात मोठया भक्तनिवासस्थानामध्ये पेस्ट कंट्रोलचे काम पूर्ण झाले असून संपूर्ण १५३६ खोल्या, टेरेस, परिसर लिक्वीड सोपने धुण्यात येत आहे. तेथील चादरी, बेडशिट, उशी कव्हर आदी धुवून स्वच्छ करण्यात येत आहेत. साई आश्रम परिसरातील झाडांची कटींगही करण्यात आलेली आहे. या संपूर्ण परिसरात प्रतिबंधात्मक औषध फवारणी करण्यात येत आहे. याबरोबरच नवीन भक्तिनिवासस्थान ५00 रुम, व्दारावती भक्त निवासस्थान, बसस्थानक येथील दोन मजले आदी ठिकाणीही स्वच्छता करण्यात येत आहे. या ठिकाणी विद्युत, बांधकाम, पाणीपुरवठा व मेकॅनिकल आदि विभागांनी आपल्याशी संबधित मेंटेनन्सची कामे हाती घेतली आहेत.

संस्थानच्या वतीने सुमारे ७ एकर परिसरात उभारण्यात आलेले भव्य असे श्री साईप्रसादालय हे पहिल्यांदा बंद ठेवण्यात आल्यामुळे या ठिकाणच्या परिसरासह किचन, मशिनरी, भोजन हॉल, भोजनासाठी वापरण्यात येणारी ताटं, ग्लासं आदींचीही स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच या संपूर्ण परिसरात प्रतिबंधात्मक औषध फवारणी करण्यात येत आहे. संस्थानच्या सर्वच विभागांनी स्वच्छतेची कामे हाती घेतले असून स्वच्छता विभागाचे विभाग प्रमुख श्री. अशोक वाळुंज यांच्यासह सर्व स्वच्छता कर्मचारी याकामी विशेष परिश्रम घेत आहेत.

**गुरुपौर्णिमेला पालखी घेऊन शिर्डीला येण्याचे टाळावे**

करोना व्हायरसच्या संकटामुळे दिनांक १७ मार्चपासून श्री साईबाबांचे समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले असून, दिनांक ४ जुलै ते ६ जुलै २०२० रोजी येत असलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त पालखी घेऊन पदयात्रींनी शिर्डी येथे येण्याचे टाळावे, असे आवाहन संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी डोंगरे यांनी केले.

श्री. अरुण डोंगरे म्हणाले, देश व राज्यावर आलेल्या करोना व्हायरसच्या संकटामुळे प्रतिबंधात्मक उपायांकरीता व विषाणूची बाधा एकमेकांना होऊ नये म्हणून भारत सरकार व राज्य शासनाच्या वतीने लॉकडाऊन करण्यात आले असून संस्थानच्या वतीने दिनांक १७ मार्चपासून श्री साईबाबांचे समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आलेले आहे. श्री साईबाबांचा महिमा व त्यांची शिकवणूक संपूर्ण जगात पोहचलेली असून त्यांचा भक्तवर्ग देशात व परदेशात मोठ्या प्रमाणात आहे. संस्थानतर्फे गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो.

(पृष्ठ ११ वर)




# अन्न पाकिटांचे वाटप

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने कर्नाटक राज्यातून राजस्थानकडे जाणाऱ्या सुमारे २५०० व्यक्तींना दिनांक २९ मार्च रोजी सायं. ६.०० वाजता शिर्डी पोलीस स्टेशननजिक अन्नपाकिटांचे वाटप करण्यांत आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे यांनी दिली.

श्री. डोंगरे म्हणाले, देश व राज्यावर आलेल्या करोना व्हायरसच्या संकटामुळे प्रतिबंधात्मक उपायांकरिता व विषाणूची बाधा एकमेकांना होवू नये म्हणून भारत सरकार व राज्य शासनाच्या वतीने लॉकडाऊन करण्यात आले असून अनेक ठिकाणांहुन कामाकरिता बाहेरगावी गेलेल्या व्यक्ती पुन्हा आपल्या मूळ गावी स्थलांतर करत आहेत. यामध्ये ६६ बसेसव्दारे कर्नाटक राज्यातून सुमारे २५०० कामगार राजस्थानकडे निघाले होते. हे सर्व शिर्डी येथे आले असता संस्थानच्या वतीने या सर्वांना अन्नपाकिटांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थान व पोलीस प्रशासनाच्या वतीने विशेष दक्षता घेवून सुरक्षित अंतर ठेवून सर्व प्रवाशांना अन्नपाकिटांचे वाटप करण्यात आले.

श्री साईबाबा स्वतः भिक्षा मागून गोरगरिबांना जेवण देत असत. तसेच बाबा नेहमी भुकेलेल्यांना अन्नदान करण्यास सांगत. श्री साईबाबांच्या याच शिकवणुकीनुसार संस्थानच्या श्री साईप्रसादालयाच्या वतीने दिनांक १८ मार्च २०२० पासून दररोज सुमारे १८०० ते २००० व्यक्तींकरिता जेवण तयार करण्यात येत असून श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण व नातेवाईक, शिर्डीपरिसरातील अनाथश्रम, वृध्दाश्रम, मूकबधिर विद्यालय, बंदोबस्तांवरील पोलीस कर्मचाऱ्यांना, शिर्डी बसस्थानकावरील निराधार व गरजूंना आणि संस्थानच्या व शासकीय कार्यालयातील सरंक्षण, स्वच्छता व इतर कार्यरत कर्मचाऱ्यांना दोन्ही वेळचे भोजन सुरक्षित अंतर ठेवून निःशुल्क पुरविण्यात येत आहे.

■■■

(पृष्ठ १० वरून)

पालखीसह येणारे पदयात्री हे या उत्सवाचे प्रमुख्य वैशिष्ट्य असते. त्यामुळे राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यातून पालखीसह येणाऱ्या पदयात्रींची संख्याही मोठया प्रमाणात असते.

या वर्षी करोना व्हायरसच्या संकटामुळे समाधी मंदिर दिनांक १७ मार्च २०२० पासून ते शासनाच्या पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे नुकताच पार पडलेला श्रीरामनवमी उत्सव अतिशय साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला. संस्थानच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सर्व पदयात्रींनी सहकार्य केले. त्याचप्रमाणे दिनांक ४ जुलै ते ६ जुलै २०२० रोजी श्रीगुरुपौर्णिमा उत्सव येत असून या कालावधीत पदयात्री साईभक्तांनी पालखी घेऊन शिर्डी येथे येऊ नये व संस्थानला सहकार्य करावे असे आवाहन श्री. डोंगरे यांनी केले.

### रामनवमी उत्सव साधेपणाने

बाबांच्या अवतार काळापासून म्हणजे १९११ सालापासून रामनवमीयात्रा अखंडपणे सुरू आहे. रामनवमीयात्रा जवळ आली असताना करोनाचे संकट आले. त्यामुळे १०८ वर्षांपासून नियमित सुरू असलेली रामनवमीयात्रा रद्द करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थ यांच्या वतीने घेण्यात आला. श्री रामनवमी उत्सवाची परंपरा लक्षात घेवून मंदिरातील उत्सव कालावधीतील धार्मिक कार्यक्रम खंडित होवू नये म्हणून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते साध्या पद्धतीने सर्व कार्यक्रम करण्यात आले. यामध्ये उत्सवाच्या प्रथम दिवशी दि. १ एप्रिल रोजी साईबाबांच्या फोटोची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर व्दारकामाई


मंदिरात अखंड पारायणाची सुरुवात करण्यात आली. उत्सवाच्या मुख्य दिवशी दिनांक २ एप्रिल रोजी व्दारकामाई मंदिरात अखंड पारायण समाप्ती व साईबाबांच्या फोटोची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. लेंडीबागेतील शताब्दी ध्वज बदलण्यात आला. गव्हाच्या पोत्याचे पूजन करून व्दारकामाई मंदिरातील गव्हाचे पोते बदलण्यात आले. रामजन्मकीर्तन मंदिर विभाग कर्मचारी संभाजी तुरकणे यांनी सादर केले. व्दारकामाई मंदिरावरील निशाणे मंदिर कर्मचाऱ्यांच्या हस्ते बदलण्यात आली. उत्सवाच्या सांगता दिनी दिनांक ३ एप्रिल रोजी श्री गुरुस्थान मंदिरात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे व त्यांची पत्नी सौ. अंजली डोंगरे यांच्या हस्ते रुद्राभिषेक पूजा करण्यात आली. काल्याचे कीर्तन मंदिर विभागातील पुजारी उल्हास वाळुंजकर यांनी केले. त्यानंतर समाधी मंदिरात दहिहंडी फोडून उत्सवाची सांगता करण्यात आली. दर गुरुवारी निघणारी श्रींची नित्याची पालखी रद्द करण्यात आली.

करोना व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्याकरिता संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र ठाकरे, मुख्यलेखाधिकारी बाबासाहेब घोरपडे, सर्व प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय नरोडे, वैद्यकीय उपसंचालक प्रितम वडगावे, वैद्यकीय अधीक्षिका डॉ. मैथिली पिंताबरे, स्वच्छता विभाग प्रमुख अशोक वाळुंज, सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी हे विशेष परिश्रम घेत आहेत.

■■■

# रक्तदात्यांची नोंद

लॉकडाऊन संपल्यावर व संपूर्ण जनजीवन सुरळीत झाल्यावर रक्ताची गरज भासण्याची शक्यता असल्यामुळे नियमित रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांनी व रक्त संकलन करणाऱ्या संघटनांनी आपले नाव, मोबाइल नंबर, रक्तगट श्री साईनाथ रक्तपेढी, शिर्डी येथे नोंदवावीत असे आवाहन संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे यांनी केले.



श्री. डोंगरे म्हणाले, सध्या महाराष्ट्र शासनाकडून विविध सामाजिक संस्था व संघटनांना रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. याकरिता असंख्य रक्तदाते स्वतःहून रक्तदानासाठी पुढे येत असले तरी करोना विषाणू हा फुफ्फुसाचा आजार असल्यामुळे त्यासाठी रक्ताची फारशी गरज भासत नाही. श्री साईनाथ रक्तपेढीमध्येकडून पुरेसा रक्तसाठा उपलब्ध आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन करण्यात आल्यामुळे तातडीची आवश्यकता सोडून इतर रुग्णांना रुग्णालयात न जाण्याच्या सूचनादेखील सरकारी पातळीवर देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे दैनंदिन अथवा नियोजित शस्त्रक्रिया सद्यपरिस्थितीत पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे म्हणावी तितकी रक्ताची गरज रुग्णालयास भासत नाही.

तसेच सर्वसाधारणपणे रक्तदानानंतर विविध प्रकारच्या चाचण्या होऊन ते रक्त ३५ दिवस रक्तपेढीमध्ये साठवले जाते. रक्ताची मागणी बघता व त्याची टिकाऊ क्षमता पाहता रक्तसाठा सांभाळणे अवघड आहे. मागणी नसेल तर दात्यांचे हे अमूल्य रक्त वाया जाण्याची शक्यता आहे. रक्तदात्याने एकदा रक्त दिल्यानंतर पुढील तीन महिने रक्तदान करु नये असा नियम आहे. त्यामुळे आता गरज नसताना रक्तदान केले तर अशा नियमित रक्तदात्यांची टंचाईही लॉकडाऊन संपल्यानंतर व संपूर्ण जनजीवन सुरळीत झाल्यानंतर भासण्याची शक्यता आहे.

याकरिता नियमित व नव्याने रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांनी व रक्त संकलन करणाऱ्या संघटनांनी आपले नाव, मोबाइल नंबर, रक्तगटासह श्री साईनाथ रक्तपेढी, शिर्डी येथे नोंदवावे जेणे करुन रक्ताची टंचाई भासल्यास रक्तादात्यांना संपर्क करुन रक्त उपलब्ध करता येईल. तसेच अधिक माहितीसाठी व नावनोंदणीकरिता ०२४२३-२५८५२५ या क्रमांकावर संपर्क करावा असेही श्री. डोंगरे यांनी सांगितले.

■■■



करोना व्हायरसपासून होणाऱ्या आजाराविरुद्ध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी दर्शनरांगेतून श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनाकरिता येणाऱ्या साईभक्तांची तापाची तपासणी करण्याकामी ११ डिजिटल नॉन कॉन्टॅक्ट थर्मामीटर संस्थानचे माजी विश्वस्त बिपीनदादा कोल्हे यांनी देणगीस्वरूपात संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रविंद्र ठाकरे, मुख्यलेखाधिकारी बाबासाहेब घोरपडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. आकाश किसवे व उपमुख्य अभियंता श्री. रघुनाथ आहेर आदी उपस्थित होते.

# ऑनलाईनद्वारे संस्थानला २ कोटी ५३ लाख

करोना व्हायरसच्या संकटामुळे दिनांक १७ मार्चपासून श्री साईबाबांचे समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले असतानाही दिनांक १७ मार्च ते दिनांक ३ मे २०२० अशा ४८ दिवसांच्या कालावधीत साईभक्तांकडून ऑनलाईनद्वारे २ कोटी ५३ लाख ९७ हजार ७७८ रुपये देणगी संस्थानला प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी दिली.

श्री. डोंगरे म्हणाले, देश व राज्यावर आलेल्या करोना व्हायरसच्या संकटामुळे प्रतिबंधात्मक उपायांकरिता व विषाणूची बाधा एकमेकांना होवू नये म्हणून भारत सरकार व राज्य शासनाच्या वतीने लॉकडाऊन करण्यात आले असून संस्थानच्या वतीने दिनांक १७ मार्चपासून श्री साईबाबांचे समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आलेले आहे.

श्री साईबाबांचा महिमा व त्यांची शिकवणूक संपूर्ण जगात पोहोलेली असून त्यांचा भक्तवर्ग देशात व परदेशांत मोठ्या प्रमाणात आहे. दिनांक १७ मार्चपासून मंदिर बंद ठेवण्यात आले असून या काळात टाटा स्कॉय, संस्थान संकेतस्थळ व मोबाईल ॲप्सव्दारे ऑनलाईन दर्शनाचा लाभ साईभक्त घर बसल्या घेत आहेत. यामध्ये टाटा स्कायवर सुमारे ३५ लाख साईभक्त ॲक्टिवेट असून १ लाख १२ साईभक्तांनी संस्थानचे मोबाइल ॲप्स डाऊनलोड केलेले आहे. तर संकेतस्थळावर दररोज सुमारे ८ ते ९ हजार साईभक्त भेट देत आहेत.

श्री साईबाबांचे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी बंद असले तरीही साईभक्तांनी बाबांना दक्षिणा देण्याची परंपरा सुरू ठेवली असून जगाच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातुन साईभक्त संकेतस्थळाव्दारे व मोबाईल ॲप्सव्दांरे ऑनलाईन देणगी संस्थानला पाठवत आहेत. दिनांक १७ मार्च ते ३ मे २०२० अशा ४८ दिवसांच्या या कालावधीत साईभक्तांकडून ऑनलाईनव्दारे २ कोटी ५३ लाख ९७ हजार ७७८ रुपये देणगी संस्थानला प्राप्त झाली असल्याचे श्री. डोंगरे यांनी सांगितले.

## साईचित्रानुभूती

# ‘साईचरणी माझा फोटो’

छाया – भगवान दातार, पुणे

जिथं निरागसता असते तिथं परमेश्वराचा वास असतो. म्हणूनच तर लहान मुलं ही देवासारखी मानतात. कोकणातल्या गुहागरमधील दुर्गादेवी मंदिरात खास नट्टापट्टा करून आलेली ही चिमुरडी. नऊवारी साडीचा झोक तर पहा. मूर्तिमंत निरागसता यापेक्षा काय वेगळी असते!



तुम्ही स्वत: काढलेला फोटो साईचरणी अर्पण करण्याची उत्तम संधी...
कोणत्याही मंदिरपरिसरात आपणास अशी काही दृश्यं दिसतात. आपल्या कॅमेऱ्याने टिपलेली अशी छायाचित्रे आपण ‘साईलीला’साठी जरूर पाठवावीत. सोबत आपलं नाव, गाव आणि मंदिराचा उल्लेख असावा.

**आपलं छायाचित्र पुढील ई-मेलवर पाठवा.**

**editor.saileela@gmail.com**



दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांनीच अन्य भक्तांची व्यवस्था पाहिली तर ते लोकसहभागाचं फार मोठं उदाहरण ठरेल. पंढरीहून आलेल्या वारकऱ्यात आपण विठ्ठल पाहतो तसचं दर्शनासाठी आलेल्या भाविकात साई पाहून त्यांची सेवा करावी या भावनेतून साईसेवक ही योजना राबविण्यात येत आहे.

**प्रतिनिधी**

# साईसेवक भक्तीचा अनोखा आविष्कार

भक्तांतच देव पाहण्याची आपली परंपरा आहे. पंढरीला जाऊन आलेल्या वारकऱ्याला नमस्कार करण्यात आपण विठ्ठलाला नमस्कार केल्याचं समाधान मानतो. गाडगे महाराज पंढरपूरला अनेकदा गेले होते. त्यांनी भक्तांसाठी धर्मशाळा, घाट बांधले. पण ते मंदिरात कधी गेले नाहीत. भक्तातच ते भगवंत पाहायचे. भक्ताची सेवा हीच भगवंताची पूजा असं ते मानायचे. शिर्डीत साईदर्शनासाठी येणाऱ्या हजारो भक्तांची व्यवस्था नीट व्हावी आणि त्यांना सुलभतेनं दर्शन घेता यावं यासाठी 'साईसेवक' ही अनोखी योजना राबवली जात आहे.

सध्या देशात सगळीकडे विज्ञान-तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास होत असला तरी दुसऱ्या बाजूला परमेश्वरावरील श्रद्धाही वेगाने वाढत आहे. याचाच परिणाम म्हणून अनेक देवस्थानांमध्ये विविध उत्सवप्रसंगी किंवा जवळपास रोजच भक्तांची गर्दी नवे नवे उच्चांक करत आहे. वैष्णोदेवी, तिरुपती, पद्मनाभ मंदिर, रामेश्वर, मदुराई, मंत्रालय, धर्मस्थळ, सिद्धिविनायक गणपती मंदिर, शनिशिंगणापूर... अशा अनेक मंदिरांमध्ये याचा प्रत्यय येतो. केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या नकाशावर असलेल्या शिर्डी येथील साईबाबा मंदिरात तर गर्दीचा ओघ दिवसेंदिवस वाढतच आहे. शिर्डी येथील मंदिरात रोज सरासरी ७० हजार भाविक दर्शनासाठी येतात. महिन्यातून अनेकदा

ही संख्या लाखापर्यंत जाते आणि रामनवमी, गुरुपौर्णिमा किंवा दसरा यासारख्या उत्सवांच्या दिवशी तर ही संख्या तीन लाखांचा टप्पा सहज ओलांडते. सर्व भक्तांना त्यांच्या आराध्य दैवताचं दर्शन सुलभ व्हावं आणि दूरवरून येणाऱ्या भक्तांच्या निवासाची आणि जेवणाची सहजतेने सोय व्हावी यासाठी शिर्डी संस्थानची विश्वस्त समिती नेहमीच प्रयत्नशील असते. या गर्दीचं नियमन करणं, लोकांची गैरसोय टाळणं आणि सर्वांनाच सुव्यवस्थेचा लाभ मिळवून देणं या दृष्टीने संस्थानने 'साई सेवक' या नावाने एक अभिनव योजना आखली. अल्पावधीतच ही 'साईसेवक योजना' हे संस्थानचं वैशिष्ट्य ठरलं आहे.

शेगाव येथील गजानन महाराज मंदिरात सेवेकऱ्यांची एक अतिशय अभिनव आणि आदर्श योजना राबविली जाते. शिर्डीच्या विश्वस्तांनी तशी योजना राबवण्याचं ठरवलं आणि भक्तांनी तिला उदंड प्रतिसाद दिला. शेगाव येथील मंदिराच्या तुलनेत शिर्डी इथं येणाऱ्या भाविकांची संख्या अनेक पटींनी जास्त आहे. जगातील ४७ देशांतून साईभक्त शिर्डीला येतात आणि ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भारतातल्या विविध प्रांतांतले विविध भाषा बोलणारे लाखो लोक शिर्डीला येत असतात. या साऱ्या गर्दीचं नियमन करणं आणि कुठलाही गोंधळ होऊ न देता भक्तांना सोयी उपलब्ध करून देणं हे काम अतिशय आव्हानात्मक आहे. संस्थानच्या 'साईसेवक' योजनेतून काम करणारे सेवेकरी सध्या श्रद्धेने ही जबाबदारी पार पाडत आहेत.

२९ जुलै २०१७ रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी ही योजना सुरू झाली. ही योजना अव्याहतपणे आणि तितक्याच उत्साहात राबवली जात आहे. मंदिरातील दर्शनरांग, साईप्रसादालय, प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या लाडूंचा विक्री विभाग, सुरक्षा विभाग, उपाहारगृह, भक्तनिवास, रुग्णालय अशा ठिकाणी हे सेवेकरी भक्तांच्या सोयीसाठी कार्यरत असतात. त्यांना 'साईसेवक' या नावाने संबोधलं जातं. या योजनेमध्ये विविध पालखी मंडळांच्या सदस्यांना प्राधान्य दिलं जातं. अशा सदस्यांनी किमान २१ भक्तांचा एक गट करून संस्थानकडे नाव नोंदवायचं असतं. आतापर्यंत ५७० पालख्यांनी आपल्या गटांची नोंदणी केली असून सर्व गटांनी आतापर्यंत 'साईसेवक' म्हणून विनामूल्य सेवा बजावली आहे.

वर्षभर ही योजना विनाअडथळा चालू राहावी यासाठी अतिशय काटेकोरपणे या उपक्रमाचं नियोजन करण्यात आलं आहे. प्रत्येक आठवड्यासाठी २१ व्यक्तींचा एक गट अशा दहा गटांची निवड करण्यात येते. म्हणजे २१० साईसेवक आठवडाभर सेवा बजावतात. या गटांचा सेवेचा आठवडा मंगळवारपासून सुरू होतो आणि पुढच्या सोमवारपर्यंत सेवेची जबाबदारी या गटाकडे असते. हे काम रोज सकाळी ६ ते दुपारी २ पर्यंत आणि नंतर दुपारी २ पासून रात्री १० पर्यंत अव्याहत चालू असतं. ॐ साईराम या मंत्राचा उद्घोष करत हे सेवेकरी अतिशय आनंदाने आपली जबाबदारी पार पाडतात. ज्यांची इच्छा असेल अशा पालखी मंडळांना एकापेक्षा अधिक गट नोंदवण्याची आणि एका गटाला एक आठवड्यापेक्षा जास्त वेळा सेवा देण्याची परवानगी देण्यात आली आहे.

प्रत्येक विभागात काम करणाऱ्या सेवेकऱ्यांना त्यांचं काम वाटून देण्यात आलं आहे. त्यानुसार भक्तांना गंध लावणं, प्रसादवाटप, भोजनव्यवस्था, विविध स्टॉलवर माहिती देणं, दर्शनरांगेची व्यवस्था पाहणं, पाणीवाटप, रुग्णांना मदत अशी कितीतरी कामं हे सेवक आनंदाने करतात.

या साईसेवकांना त्यांचं काम व्यवस्थितपणे करता यावं या दृष्टीने संस्थानने काही सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या साईसेवकांना संस्थानचं ओळखपत्र देण्यात येतं. त्यांना सेवेच्या कालावधीपुरता गणवेश देण्यात येतो. त्यांच्या निवासाची, भोजनाची व न्याहारीची व्यवस्था संस्थानतर्फे निःशुल्क करण्यात येते. सेवेच्या कालावधीमध्ये साईसेवक आजारी पडल्यास त्याच्यावर संस्थानच्या रुग्णालयात मोफत उपचार केले जातात.

साईसेवकांसाठी संस्थानने काही नियमही घालून दिले आहेत. या नियमांचा भंग करणाऱ्या किंवा कोणत्याही स्वरूपाचं गैरवर्तन करणाऱ्या साईसेवकांची सेवा तत्काळ बंद करण्यात येते. या सेवकांना त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणीच सेवा करता येईल आणि आपल्याला विशिष्ट ठिकाणीच सेवेची संधी दिली जावी असा आग्रह त्यांना धरता येणार नाही, असं संस्थानने स्पष्ट म्हटलं आहे. सेवेचा आठवडा पूर्ण झाल्यानंतर या सेवकांनी त्यांचा गणवेश, सेवाकार्ड आणि ओळखपत्र संबंधित विभागाकडे जमा करायचं आहे. सेवेच्या कालावधीत साईसेवकाकडून फसवणुकीचे, भोंदूगिरीचे किंवा अंधश्रद्धा फैलावण्याचे कृत्य घडल्यास त्याच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात येईल असंही नियमावलीत बजावण्यात आलं आहे.

साईसेवक म्हणून नाव नोंदवण्यासाठी सुरुवातीला पोलीस व्हेरिफिकेशन अनिवार्य करण्यात आलं होतं. मात्र आता ही अट शिथिल करण्यात आली असून पालखीगटाचे प्रमुख अथवा मंडळाचे अध्यक्ष यांचे

### मी शपथ घेतो की...

साईसेवक म्हणून काम करतांना काही नैतिक बंधन असणं आवश्यक आहेत. त्यासाठी आम्ही एक शपथ निश्चित केली आहे. साईसेवक म्हणून काम सुरू करताना प्रत्येकाला ही शपथ घ्यावी लागते. ही शपथ पुढीलप्रमाणे आहे.

**‘‘मी (साईसेवक) श्री साईबाबांना स्मरुन साईसेवक म्हणून शपथ घेतो, की–**

- **मी सदैव स्वच्छतेचे पालन करीन.**
- **मी सदैव निर्व्यसनी राहीन.**
- **मी कोणतेही गैरवर्तन करणार नाही.**
- **मी अंधश्रद्धानिर्मूलनासाठी सदैव प्रयत्नशील राहीन.**
- **मी साईबाबांच्या श्रद्धा व सबुरी या मंत्राचे पालन करीन.**
- **मी प्रत्येकाची भक्तिभावाने सेवा करीन.**
- **मी प्रत्येकाशी नम्रतेने आणि सौजन्याने वागीन.**
- **मी साईसेवक पदाचा काया, वाचा व मनाने सदैव सन्मान राखीन.**

**ॐ साई राम.’’**






### अपघात विमायोजना

या सेवेकऱ्यांसाठी राबविलेली आणखी एक अभिनव योजना म्हणजे संस्थानने सुरू केलेली अपघात विमायोजना होय. सात दिवस सेवा दिलेल्या सेवेकऱ्यांचा एक लाखाचा अपघात विमा संस्थानतर्फे उतरवण्यात येतो आणि त्याचं प्रमाणपत्र निरोप समारंभातच संबंधित सेवकाला दिलं जातं. १७ जुलै २०१८ पासून ही योजना सुरू करण्यात आली असून आतापर्यंत ९१६ साईसेवकांना या विम्याची प्रमाणपत्रं देण्यात आली आहेत.

### सेवेबद्दल प्रमाणपत्र

साईसेवक योजना राबवताना संस्थानने अनेक अभिनव गोष्टींचा प्रयोग केला. त्यानुसार सेवेसाठी येणाऱ्या सेवेकऱ्यांचा स्वागत समारंभ आणि सेवा देऊन जाणाऱ्या सेवेकऱ्यांचा निरोप समारंभ एकाच वेळी संपन्न होतो. यावेळी सेवा देऊन जाणारे सेवक आपले अनुभव कथन करतात. जाणाऱ्या सेवकांना त्यांच्या सेवेबद्दलचं प्रमाणपत्र दिलं जातं आणि येणाऱ्यांना शपथ दिली जाते.

प्रतिज्ञापत्र आवश्यक करण्यात आले आहे. सर्वच भक्तांच्या मनात साईसेवेची तीव्र इच्छा असल्याने या योजनेला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. हा एक प्रकारचा विक्रमच आहे. या सेवकांना भोजन, निवासाच्या सोयींव्यतिरिक्त अन्य कुठलाही मोबदला देण्यात येत नाही हे या योजनेचं मुख्य वैशिष्ट्य आहे. पूजनीय साईबाबांवर श्रद्धा असलेले भक्त सगळ्या प्रांतातून शिर्डीत येतात. साईसेवक म्हणूनही सर्व प्रांतातून भक्त आपली नावं नोंदवतात. आंध्रमधील भक्तांचा ‘साईसेवक’ संख्येच्या बाबतीत पहिला क्रमांक आहे. आंध्रमधून आतापर्यंत २५० गटांतून ५३०० सेवकांनी सेवा बजावली आहे. त्याखालोखाल महाराष्ट्रातील १८८ गटातील ३६१९ सेवकांनी सेवा बजावली आहे. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, उत्तराखंड यासारख्या अतिदूरच्या राज्यातील भक्तांचे गटही सेवेसाठी आले आहेत. काही तर परदेशांतूनही येतात.

साईलीलाचा जानेवारी – फेब्रुवारीचा अंक लॉकडाऊनमुळे उशिरा वितरित होत आहे. त्यामुळे त्या आणि चालू अंकातील प्रश्नमंजुषाची उत्तरं पुढील अंकात प्रसिध्द केली जातील.

– कार्यकारी संपादक

**तुम्ही फक्त एवढंच करायचं –**

१) आपल्या फोनवरील Camera किंवा QR Scanner App उघडून खाली दिलेला QR Code स्कॅन करावा. २) क्विझचं पान आपोआप न उघडल्यास स्क्रीनवरील लिंक उघडावी. ३) सर्वप्रथम आपला email ID दिलेल्या जागी भरावा. ४) यानंतर सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे निवडावी व शेवटी Submit करावे. ५) उत्तरे submit केल्यावर आपल्याला आपले गुण पाहता येतील. उत्तरे पुढील अंकात छापली जातील. ६) कुठलाही प्रश्न तुम्हाला कठीण वाटला, तर हाच अंक बारकाईने वाचा; तुम्हाला त्या प्रश्नाचं उत्तर याच अंकात सापडेल.

**Visit this link : bit.ly/saiquiz5**
**or Scan this QR Code to answer the questions**

# साई प्रश्नमंजुषा



मार्च–एप्रिल २०२०

**१) श्री साईसच्चरिताच्या विसाव्या अध्यायात दासगणूंना ईशावास्य प्रकरणी पडलेली शंका कोणी दूर केली?**
अ) शामा
ब) मोलकरीण
क) मिरीकर
ड) राधाबाई

**२) प्रापंचिकाला ओलांडायला कुठला घाट सर्वात कठीण आहे असं श्री साईसतच्चरिताच्या १५ व्या अध्यायात म्हटलं आहे?**
अ) नाणेघाट
ब) खंडाळा घाट
क) उंबरे घाट
ड) चंदनापुरी घाट

**३) या अभिनेत्याच्या भूमिकेमुळे साईबाबा घरोघर पोहोचले.**
अ) मनोजकुमार
ब) सुधीर दळवी
क) श्रीराम लागू
ड) राजा गोसावी

**४) श्री साईसच्चरिताचा गोविंद दाभोलकरानी लिहिलेला शेवटचा अध्याय कोणता?**
अ) ५०
ब) ५१
क) ५२
ड) ५३

**५) साईबाबा स्वतःला काय म्हणत?**
अ) अल्लखनिरंजन
ब) यादेहक
क) मालिक
ड) माउली

**६) म्हाळसापतींना साईबाबा पहिल्यांदा कोणत्या देवळात भेटले?**
अ) खंडोबा
ब) विरोबा
क) मारुती
ड) दत्तात्रय

**७) करोनाबरोबरच्या दीर्घकालीन लढ्यात साईंचा कोणता संदेश उपयोगी पडेल.**
अ) भक्ती
ब) नामस्मरण
क) अहिंसा
ड) सबुरी

**८) बाबांच्या कोणत्या शिष्यास सरकारकडून तलवार बक्षीस मिळाली?**
अ) म्हाळसापती
ब) दासगणू
क) काशीराम
ड) शामा

**९) कोणत्या पदाच्या इंग्रजी अद्याक्षरातून साई प्रकटतात?**
अ) मुख्यमंत्री
ब) भा प्र से
क) जिल्हा पोलीस प्रमुख
ड) सरन्यायाधीश

**१०) श्री साईसच्चरिताच्या २७ अध्यायात बाबांनी शामाला कोणती पोथी दिल्याने वाद झाला?**
अ) भगवद्गीता
ब) रामरक्षा
क) विष्णुसहस्त्रनाम
ड) गुरुचरित्र

# शहाणे करून सोडावे



योगिनी कुलकर्णी

**कोणत्याही उपक्रमासाठी मनातला निर्धार महत्त्वाचा असतो. या निर्धाराला सकारात्मक स्वरूप दिलं तर अनेक चांगल्या गोष्टी सहजपणे घडतात. पुण्यातल्या योगिनी कुलकर्णींना अशीच एक प्रेरणा झाली आणि त्यातून दासबोधाच्या अभ्यासाचा एक उपक्रम सुरू झाला. वेळ जात नाही असा प्रश्न पडणाऱ्या महिलांना यातून कितीतरी बोध घेता येईल.**

**आपणासी जे ठावे ।**
**ते इतरांसी सांगावे ।**
**शहाणे करून सोडावे ।**
**अवघेजन ।।**

समर्थ रामदास स्वामींनी सांगितल्याप्रमाणे वागणेही खरं तर आजच्या काळाची गरज आहे. पण असे असतानाही घराघरातील संवादच हरवत चाललेला दिसत असताना, ते इतरांशी संवाद करण्याचा प्रश्नच कुठे येतो! पण अर्थातच यालाही काही अपवाद असतात. जी मंडळी घराघरातील संवाद तर उत्तम राखतातच पण आपल्या समाजातील मंडळींशी संवाद साधत, त्यांच्या दैनंदिन आयुष्यात वैचारिक सधनता यावी, ज्यायोगे राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सहजता, सुविचारांची जडणघडण आणि जनमानसात बळकटी यावी म्हणून प्रयत्नशील असतात, अशा काही अपवादांपैकीच एक नाव म्हणजे योगिनी कुलकर्णी.

पुण्यनगरीत लहानाचे मोठे झालेल्या आणि लग्नानंतर पुण्यातच राहून पुण्यनगरीच्या वैचारिक वैभवात भर घालण्याचे कार्य त्या करीत आहेत. त्यांचे शिक्षण मराठी शाळेतून झाल्यामुळे आणि उत्तम शिक्षक मिळाल्यामुळे साहित्याची गोडी त्यांना शाळेतच लागली. त्यातच आईवडिलांना वाचनाचे वेड, जाणतेपणाने त्यांच्याकडे आले. त्यामुळे साहित्याबद्दलची गोडी दिवसेंदिवस वाढत गेली. वाचनात कथा, कादंबऱ्या, ललित साहित्याबरोबरच धार्मिक, आध्यात्मिक पुस्तकांचेही त्या वाचन करीत होत्या आणि यानिमित्ताने घरात, मैत्रिणींमध्ये होणाऱ्या वाचनविचारांमध्येही सहभागी होत होत्या. अभिनव शाळेतील शिक्षण आणि

**सोहम आपटे**

सण, समारंभउत्साहानं करण्याकडे घरच्यांचा कल.

योगिनीताईंनी महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करताना तत्त्वज्ञान विषय घेतला, त्यावेळी भारतीय आध्यात्मिक ग्रंथ, निरनिराळ्या विचारवंतांचे सिद्धांत त्यांनी अभ्यासले होते. तेव्हा त्यांच्या शेजारच्या काकूंनी पत्राद्वारे दासबोध अभ्यास पूर्ण केला होता. त्या समीक्षक म्हणूनदेखील काम करीत होत्या. योगिनीताईंना त्या नेहमी सांगत की, दासबोध हा लहाणपणीच अभ्यासायचा ग्रंथ आहे. त्यांच्याशी वारंवार होत असणाऱ्या चर्चेमुळे योगिनीताईंची दासबोधाबद्दलची उत्सुकता वाढत होती.

महाविद्यालयीन जीवनानंतर त्यांची वाटचाल संसारचक्राच्या दिशेने झाली आणि त्या काही काळासाठी या संसारजीवनात रममाण झाल्या. तरीदेखील त्यांची दासबोध अभ्यास करण्याची ओढ काही स्वस्थ बसू देत नव्हती. या काळात त्यांनी तब्बल अकरा वर्ष अध्यापनक्षेत्रात काम केले. दासबोधवाचनाची ओढ होती, पण सांसारिक जबाबदाऱ्यांमुळे दासबोधवाचनापासून त्या लांबच राहिल्या. त्यातच त्यांच्या पतीची बदली मुंबईला झाली आणि योगिनीताईंना मोकळा वेळ मिळू लागला. पुण्यात न पुरणारा दिवस खायला उठू लागला. सकाळची घरची कामे झाल्यानंतर, मुलीला शाळेत सोडल्यानंतर तसे काही व्यवधान नव्हते. नवीन जागा, अनोळखी माणसे, नवीन हवा, या सगळ्यांत दासबोधवाचनाच्या त्यांच्या ऊर्मीत समर्थांनी चेतना निर्माण केली. योगिनीताईंनी मुंबईतील वास्तव्यात तीन वर्षांचा दासबोधाचा पत्राद्वारे अभ्यास पूर्ण केला. डोंबिवलीच्या समीक्षिका रेवा

देशपांडे त्यांना लाभल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली योगिनीताईंचा हा अभ्यासक्रम पूर्ण झाला आणि रेवाताईंनी त्यांचे नाव दासबोध केंद्राला समीक्षक म्हणून सुचवले आणि त्यामुळे अधिक सखोलपणे दासबोधाच्या अभ्यासात योगिनीताई दंग झाल्या. याच दरम्यान योगिनीताई मुंबईतून परत पुण्यात आल्या. मुलीचे दहावीचे वर्ष असल्यामुळे त्यांनी परत नोकरी न करण्याचा निर्णय घेतला होता. पण घरी स्वस्थ बसणेही जड जात होते, म्हणून त्यांनी गीता संथा वर्गाला जाण्यास सुरुवात केली. त्यातील कृष्णअर्जुन संवादाने त्यांचे मन पुरते भारून गेले होते. गीतेतील सांख्ययोग, कर्मयोग, विभूतियोग हे सगळे समजावून घेताना त्यांचे मन भारून जात होते, त्यातच बघता-बघता अठरावा अध्याय सुरू झाला आणि योगिनीताईंच्या मनात एक अनामिक हुरहूर दाटून आली. आपल्या हातून काहीतरी निसटतंय असे त्यांना वाटायला लागले. इतके दिवस जो कृष्ण-सखा, गुरू, बंधू बनून अर्जुनाला म्हणजेच पर्यायाने योगिनीताईंना ज्ञान देत होता, तो संवाद आता थांबणार, निदान वर्गाच्या स्वरूपातला तरी थांबणार या भावनेने त्यांचा कंठ दाटून येऊ लागला.

या सगळ्या भावास्थेतून जात असताना योगिनीताईंच्या आयुष्यात एक चमत्कार घडला. एका संध्याकाळी योगिनीताई त्यांच्या मैत्रिणीसोबत भाजी आणण्यासाठी गेल्या असताना, त्यांना अजून एक मैत्रीण तीन-चार वर्षांनी भेटली. ख्यालीखुशालीच्या गप्पा झाल्या. या गप्पांमधून मैत्रिणीला कळले की, योगिनीताई दासबोध उपक्रमाच्या समीक्षिका आहेत, त्यावेळी तिने आपल्याला योगिनीताईंनी दासबोधाचे निरुपण करावे अशी गळ घातली. दासबोधाचा वर्षानुवर्ष अभ्यास करणाऱ्यांना दासबोध समजून घेणे, आत्मसात करणे जसे अवघड जाते, तसेच असे एकदम उठून निरुपण करणेही सोपी बाब नसते, हे योगिनीताई जाणून होत्या. त्यामुळे त्यांनी मैत्रिणीला तसे समजावून सांगण्याचा प्रयत्नही केला. पण योगिनीताईंना दासबोध निरुपणाचा वर्ग घ्यावा, या आग्रहावर मैत्रीण हटूनच बसली. आपण त्या वर्गाला येऊ आणि तू वर्ग सुरू कर असे तिने परत-परत योगिनीताईंना सांगितले. योगिनीताई कशीबशी समजूत घालून पुढे गेल्या, तेव्हा भेटलेल्या दुसऱ्या एका मैत्रिणीच्या संवादातूनही हाच वर्ग सुरु करण्याबाबतचाच सूर निघत होता.

या सगळ्यामुळे दासबोध निरुपणाची गरज आणि हा दैवी संकेत असल्याचे मानून दोन दिवसांच्या विचारांनंतर योगिनीताईंनी वर्ग सुरु केला आणि पाहता-पाहता सव्वातीन वर्षांच्या कालखंडात त्यांनी दासबोधावर निरुपण केले. त्यांच्या मैत्रिणींसह आजूबाजूच्या इमारतीतील एकोणीस महिलांनी या निरुपणश्रवणाचा आनंद घेतला आणि त्यातून योगिनीताईंसह त्यांच्याही चित्तवृत्ती पालटल्याचा अनुभव सर्वांनाच येतो आहे. वयाबरोबरच त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीत तफावत असली तरी त्या सर्वांना समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधातील ओव्यांनी एका सूत्रात गुंफले आहे. श्रीसमर्थांच्या प्रेरणारूपी आशीर्वादाबरोबरच मिळणारे मौलिक मार्गदर्शन त्याबरोबरच समर्थभक्त सुनील चिंचोळकर, प.पू. बाबा बेलसरे यांची पुस्तके, विवेचनेही मदतीला होतीच.

या निरुपणाला येणाऱ्या एक ताई गेली चार वर्षे रोज खाडा न करता एका समासाचे वाचन करतातच, तर निरुपणाला येणाऱ्या दुसऱ्या ताईंच्या घरून दासबोध शिकण्याला विरोध होता, पण तरीदेखील त्या विरोधाला न जुमानता दासबोधश्रवणासाठी येतच राहिल्या. या विरोधकाळातही त्यांनी समर्थांची वचने, त्यांचे विवेचन याबद्दल घरात हळुहळू सुरू केलेली चर्चा यामुळे घरातील वातावरण प्रसन्न झाले आणि दासबोध शिकायला जाण्याबद्दलचा घरच्यांचा विरोधही मावळला. असे विविध अनुभव घेत पाहता-पाहता हा वर्ग संपला. त्यावेळी योगिनीताईंबरोबरच येणारी श्रोतेमंडळीही भावूक झाली.

दासबोधवाचन आणि निरुपण झाले असेल तर दुसऱ्या एखाद्या ग्रंथावर निरुपण सुरू करावे, असा आग्रह सगळ्यांनी धरला. या आग्रहातूनच योगिनीताई 'अभ्यासे प्रकट व्हावे' हे ध्यानात घेऊन ज्ञानेश्वरीचे निरुपण करीत आहेत. या वाचनामागे उद्देश केवळ हा की, आपल्या संतांनी लिहिलेल्या वाङ्मयाचा अभ्यास व्हावा, त्यातही ज्ञानेश्वरी वाचावी, समजून घेण्याचा प्रयत्न करावा. या वाचन, मनन, चिंतनाबरोबरच येणाऱ्या महिलांना सहज-सोपे होईल अशा भाषेत निरुपण करताना योगिनीताई आणि हे निरुपण ऐकण्यासाठी येणारी मंडळी ज्ञानेश्वरी निरुपणातही रंगून जातात. या सगळ्या निरुपणाबरोबरच पुण्यातील या सगळ्या महिलांनी मिळून एक सामाजिक कार्यही हाती घेतले आहे, पुण्यातीलच एका सामाजिक संस्थेतील मुलांना सगळ्या मिळून दाण्याची चटणी देणगीदाखल देण्याचे कार्यही करीत आहेत.

अध्यात्म आणि सामाजिक कार्य या दोन्हींमध्ये आम्ही पुढे आहोत, हे योगिनीताईंसह या सर्व महिला मंडळाने दाखवून दिले आहे. त्यांचे कार्य असेच सुरू राहावे हीच समर्थचरणी प्रार्थना.

■■■

# तेथे कर माझे जुळती



**अनेक सेवाव्रती, ईश्वराचे दूत होऊन मानवाची सेवा करत आहेत. तिथे परमार्थ आहे; पण स्वार्थ नावालाही नाही. तिथे परमात्म्याचं दर्शन आहे; पण प्रदर्शन अजिबात नाही. तिथे आहे तो फक्त आणि फक्त निखळ आनंद, निर्मळ मन, अढळ निष्ठा, सात्त्विकता. अशा या सेवाव्रतींसाठी 'तेथे कर माझे जुळती।' याशिवाय आणखी वेगळी भावना ती कोणती असणार!**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या पवित्र मातीत अनेक संतांनी लौकिकार्थाने जन्म घेतला. खरं तर, प्रत्येक युगायुगात अधिकाधिक अध:पतीत होत जाणाऱ्या समाजाचं उत्थापन करण्यासाठीच संतांचा अवतार असतो; नव्हे, ही त्या त्या काळाचीच गरज असते.

असे अवतार अव्यक्तातून आकाराला येतात आणि कार्यसमाप्तीनंतर पुन्हा त्या अव्यक्तात विलीन होतात. ते देहरूपाने येथे असोत, वा नसोत, त्यांचं अनंतत्व मात्र सदैव प्रतीत होत राहतं; किंबहुना त्यांच्या अवतारसमाप्तीनंतर तर ते अधिक प्रकर्षाने जाणवू लागतं.

संतांचा अवतार घेण्याच्या पार्श्वभूमीचा विचार करताना असं लक्षात येतं की, याचं कारण आपल्या मानवी प्रवृत्तीतच दडलेलं आहे. प्रत्येक मनुष्यप्राणी हे चांगल्या-वाईटाचं, दैवी आणि आसुरी संपत्तीचं कमी-अधिक मिश्रण आहे. आसुरी संपत्ती अथवा दुष्ट प्रवृत्तीच आपल्याला अधिक आकर्षून घेतात. इतकंच नव्हे, तर कधी कधी आपल्याला अधर्माने वागायला लावतात आणि अनेकदा खोल गर्तेत रुतवून, आयुष्यातूनही उठवतात. एकूणच, वर वर मोहून टाकणाऱ्या या दुष्प्रवृत्ती अंतिमत: मानवाच्या नाशाला कारणीभूत होतात. कोळी जसं सुंदर जाळं विणतो आणि अखेर त्यातच अडकून मृत्यू पावतो तशी आपली गत असते.

**समाजाचं उन्नयन हेच संतांचं कार्य!**

बेगडी आणि अशाश्वत सुखाला चटावलेल्या आपल्यासारख्या दुबळ्या जीवांना त्यापासून परावृत्त करून योग्य मार्गावर आणणं अशा वेळी फारच

**मुग्धा दिवाडकर**

महत्त्वाचं असतं... आणि हेच कार्य संत, सद्गुरू करतात. भक्तीच्या झेंड्याखाली सर्व समाजाला एकत्र आणून चुकलेली प्रवाहाची दिशा सत्कार्याच्या मार्गाने वळवून समाजाचं उन्नयन करायचं, हे त्यांचं अद्वितीय असं कार्य असतं.

परमार्थाचं विवेचन करताना नवविधा भक्ती म्हणजे काय, परमार्थाचा सोपान चढून जाणं प्रत्येक जीवासाठी अपरिहार्य का आहे, त्यासाठी सद्गुरू कसा वाटाड्या, मार्गदर्शक आणि सहाय्यक होतो, सत्संगतीचं महत्त्व काय, प्रपंचाचं अशाश्वत स्वरूप आणि परब्रम्हाचं शाश्वत रूप याची जाणीव सतत ठेवणं का आवश्यक आहे, आत्मोन्नती म्हणजे नेमकं काय आणि ती प्राप्त कशी करून घ्यायची इत्यादी अनेक प्रश्नांची उकल त्यांच्या सहवासाने, त्यांच्या सत्संगाने अथवा त्यांच्या ग्रंथसाहित्यातून आपल्याला अगदी सहजपणे होते.

भक्तीसाठी प्रथम श्रद्धा अनन्यतम असावी लागते आणि निष्ठा अत्यंत बळकट! भक्तीचा गाभा नीती आणि नीतीचा गाभा सदाचार! त्यामुळेच पारमार्थिक उन्नयनाबरोबरच, त्यातूनच सामाजिक जाणीवेचं भान संतांनी आपल्याला वेळोवेळी आवर्जून करून दिलं आहे.

जाती, पंथ, धर्म यांचा खरा अर्थ समजून न घेता समाजाला चिथावणं, इंद्रियभोगांत रमणं, संस्कृतीचं अध:पतन करण्यात धन्यता मानणं, अंधश्रद्धा, बुवाबाजी, अनाचार इत्यादी करू नये त्या गोष्टी करणं, भोगवादी जीवनाला अवास्तव महत्त्व देणं आणि मुख्य म्हणजे, 'सर्वांभूती परमेश्वर' या भागवत धर्माच्या परमपवित्र संकल्पनेलाच तिलांजली देणं, म्हणजे तुकाराम

महाराज म्हणतात त्याप्रमाणे 'तुका म्हणे गाढव पशु। केला नाशु आयुष्याचा।।'... दुसरं काय?

तर, काही लोक याच्या वाटेला जात नाहीत; पण होमहवन, पूजापठण, उपासतापास, कर्मकांड, यज्ञयाग, अनुष्ठान म्हणजेच अध्यात्म असं समजून त्याच्याच पाठी लागतात. हे केलं म्हणजे आपण धार्मिक आहोत, सेवाव्रती आहोत, अशी मनाची समजूत करून घेतात. हीच परमेश्वराची सेवा, असं मानतात. हे चुकीचं नसलं तरी यामध्येच गुंतून पडणं हानिकारक ठरतं. यातून मिळालेला आनंद शाश्वत असणार नाही, हेही निश्चित! किंबहुना, यामध्ये दिखाऊपणाच अधिक असतो.

**अखंड सेवाव्रती होणं हाच खरा परमार्थ**

खरं तर भगवंताला यातलं काहीच अपेक्षित नाही. जातीसंस्थेची चौकट, भक्तिहीन जीणं, ही कर्मकांडं, दिखाऊ आणि बेगडी प्रेम हे त्याला मुळात मान्यच नाही. त्याला पाहिजे आहे ते वैराग्यपूर्ण आणि त्याच्या शिकवणुकीप्रमाणे केलेलं आचरण, निर्मळ भक्ती, अनुभवांचा सच्चेपणा, अंत:करणातील समत्व, फलाची अपेक्षा न करता केलेली सेवा... मग ती भगवंताची असो अथवा एखाद्या दुबळ्या गरजू जीवाची! सांगायचं काय, तर चैतन्याची अनुभूती घेत जीवनातलं पावित्र्य जपणं आणि अखंड सेवाव्रती होऊन त्यातून मिळणारा आनंद लुटणं म्हणजेच खरा परमार्थ!

आपला देह नश्वर आहे. तरीही त्याचे फाजील लाड पुरवण्यातच आपण आपलं स्वार्थी आयुष्य खर्ची घालतो. पण, बंधुभगिनींनो, हा स्वार्थ भगवद्चिंतनाने आपल्याला स्वार्थत्यागात बदलता येतो. म्हणूनच आपले बाबा नेहमी म्हणत, 'आपला आतला आवाज ओळखायला शिका!'




असं आहे, देह हे मंदिर मानलं, तर आतला आत्मा हा ईश्वर आहे आणि तो तुमच्या-माझ्या, एकूणच प्रत्येक सजीव आणि निर्जीवातसुद्धा भरून राहिला आहे. मग तो आपल्या अंतरंगातच असताना आपल्याला शाश्वत सुख, समाधान का प्राप्त होत नाही? तर, ते मिळवण्याचा आपला मार्गच मुळात चुकलेला असतो... कारण, हा आनंद मिळविण्यासाठीची आपली धडपड केवळ स्वत:च्या चौकटीपुरती असते. मी आणि माझं कुटुंब एवढ्यापुरतीच ती मर्यादित असते. इतरांशी त्याचं काही देणं-घेणं नसतं... आणि कर्तव्यात जो चुकतो आणि भगवंताला विसरतो त्याला शाश्वत सुख, समाधान कसं प्राप्त होणार! पण, जे या मार्गाने न जाता ईश्वरप्रणित मार्गाने जातात ते मात्र हा शाश्वत आनंद मिळवून धन्य होतात.


म्हणूनच, आपल्याला नीतीबोध देताना साईबाबांसारख्या संतांनी स्वत: सेवाव्रती होऊन जगाला सन्मार्ग दाखवला. संत ज्ञानेश्वरांनी तर स्वत:साठी नाही, अमूक एका समाजासाठी नाही, तर अवघ्या विश्वासाठी 'पसायदान' मागितलं. त्यांनी आधी केलं आणि मगच जगाला सांगितलं.


भगवंताने दाखवलेल्या मार्गाने जाणं, त्याच्या वचनांचं पालन करणं, त्याप्रमाणे आचरण करणं, दीनदुबळ्यांची सेवा करणं आणि प्रत्येक जीवात भगवंत पाहणं, हीच खरी भक्ती आणि हीच खरी भगवद्सेवा! भक्तीची परिणती अखेर विश्वकल्याणातच होणार ना!

**परमार्थाचा राजमार्ग अर्थात् विश्वकल्याण!**

आत्मकल्याण, समाजकल्याण आणि पर्यायाने विश्वकल्याण, हाच संतांना अभिप्रेत असलेला परमार्थाचा राजमार्ग आहे. याचं मार्गदर्शन करतच संतांनी समाजप्रबोधन केलं. भरकटलेल्या जीवाला ताळ्यावर आणण्यासाठी याचाच उपयोग केला आणि आपल्या भक्तांना आत्मज्ञानाचा लाभ मिळवून दिला.

प्रत्येक जीवातल्या सद्गुणांची वृद्धी व्हावी म्हणून संतांची नेहमीच धडपड





असते. साईबाबांनीही नेहमी याच मार्गाचा अवलंब केला. ईश्वरसेवेबरोबरच त्यातून निर्माण होणारी समाजसेवेची मनोधारणा एकदा का पक्की झाली की हा ब्रह्मानंदाचा लाभ असे सात्त्विक जीव स्वत:पुरताच मर्यादित ठेवत नाहीत; साऱ्या जगाला वाटण्यासाठी ते तत्पर होतात. देह अंतर्बाह्य निर्मळ झालेला असतो. अहंकार समूळ विलयाला गेलेला असतो. त्यातूनच 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।।' ही विश्वात्मक भावना निर्माण होते. अशा निर्मळ व्यक्तींच्या समाजसेवेमुळे मग परमार्थालाही बळकटी येते.

हे लिहिताना थोर तत्वचिंतक आणि अध्यात्माचे गाढे अभ्यासक कै. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांची तीव्रतेने आठवण होते. ते म्हणतात, 'आपल्या आयुष्यातील उगवणारा प्रत्येक दिवस आणि दिवसातील प्रत्येक क्षण याचा हिशेब आपणास देता आला पाहिजे. दुसऱ्याजवळ नसला, तरी आपला आपणास देता यावयास हवा. कारण, आपले आयुष्य जसे आपले आहे तसेच ते त्याहून अधिक आपल्या साऱ्या समाजाचे आहे. यासाठीच आपले आयुष्य ही आपली वैयक्तिक मिरासदारी केव्हाही मानू नये. साऱ्या समाजाचा त्यावर तुमच्याइतकाच हक्क आहे. आपण आपल्या बळावर जगू शकत नाही. अनेकांचे प्रेम, सहकार्य, सहाय्य जगण्यासाठी आवश्यक असते.'

याचाच अर्थ, समाजस्वास्थ्य जर टिकवायचं असेल तर सामाजिक जाणीवेचं भान व्यापक असणं अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर ईश्वरावरील श्रद्धा आणि समाजसेवा यांची सांगड घालणंही अपरिहार्य आहे.

साईबाबांच्या सहवासात आलेल्या जवळपास सर्वच व्यक्तींनी हे भान कायम जपलं. किंबहुना, संतांची शिकवण शिरोधार्य मानून त्याप्रमाणे आचरण करणं आणि 'त्या सेवेत स्वत:ला झोकून देणं, हीच खरी परमेश्वराची सेवा!' हे त्यांनी पूर्णपणे ओळखलं. 'काया, वाचा, चित्त व वित्त' याद्वारे, ही सेवा, हे भान असणाऱ्या प्रत्येकाला करता येते. आणि म्हणूनच, यासंदर्भात बोलताना साईसहवासातील काही सेवाव्रतींचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. संतकवी दासगणू महाराज, राधाकृष्णाआई, काकासाहेब दीक्षित, मिरीकर घराणे, नानासाहेब चांदोरकर, दादासाहेब खापर्डे, कृ. जा. भिष्म, श्रीमंत गोपाळराव बुट्टी, रा. ब. प्रधान, बाळासाहेब देव, रा. ब. धुमाळ, अण्णासाहेब दाभोलकर, साईशरणानंद, आनंदराव पाखाडे, माधवराव अडकर, बाबासाहेब तर्खड, मुक्ताराम, बाळाराम मानकर इत्यादी अनेकांनी श्री साईबाबांसारख्या संतांच्या शिकवणुकीचा, बोधाचा प्रचार आणि प्रसार करून जनसामान्यांना परसेवेचं महत्त्व पटवून दिलं. इतकंच नव्हे, तर स्वत: त्या मार्गाने जाऊन आपल्याबरोबरच इतरांनाही आत्मकल्याणाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी उद्युक्त केलं.


तर, भागोजी, बायजाबाई, लक्ष्मीबाई, तात्या कोते पाटील, म्हाळसापती, माधवराव देशपांडे यासारख्या अनेक अधिकारी व्यक्तींनीही शिर्डीत साईसहवासात राहून लोकांना साईसेवेचं, एकूणच भगवंताचं 'जगोद्धाराचं कार्य' समजावून देऊन त्याचं दान लोकांच्या पदरात भरभरून टाकलं.

आजही असे अनेक सेवाव्रती, ईश्वराचे दूत होऊन त्याच्या सेवेत आणि पर्यायाने समाजसेवेत रहात आहेत. तिथे परमार्थ आहे; पण स्वार्थ नावालाही नाही. तिथे परमात्म्याचं दर्शन आहे; पण प्रदर्शन अजिबात नाही. तिथे आत्मसन्मान आहे; पण अहंकाराचा लवलेशही नाही. तिथे आहे तो फक्त आणि फक्त निखळ आनंद, निर्मळ मन, अढळ निष्ठा, सात्त्विकता, शुद्ध भाव, समर्पणाची भावना आणि प्रचंड आत्मविश्वास!

अशा या सेवाव्रतींसाठी 'तेथे कर माझे जुळती।' याशिवाय आणखी वेगळी भावना ती कोणती असणार!

■■■

# काव्यसरिता



सगुण मनोहर रूप लावण्य
भक्तांच्या प्रेमाला आले उधाण।

ओळखावा कसा कुठे ईश्वर?
मनी साचलेला होता काहूर।

अरूपासी या शोधावा कैसा?
आकळते आम्हा शब्द-स्पर्शाची भाषा।

अचानक मग चमत्कार घडला
भक्तांसाठी तो माय माउली झाला!

घननिळा सावळा घनश्याम काळा
काळ्या रंगातच मग विठू आकारला।

पुंडलिकाचे भेटी काळ तिष्ठावला
विठोबाराया पंढरपुरासी भेटला।

- मृणाल साने

# मार्ग तयाचा तोच दावील ...

## साई कृपानुभव

'तुमचा मी भार वाहीन सर्वथा' असं वचन साईबाबांनी भक्तांना दिलेलं आहे. श्रद्धेने साद घातली तर बाबा कोणत्याही संकटात पाठीशी उभे राहतात. असा अनेकांचा अनुभव आहे. भक्तांना आलेल्या अशा अनुभूतींचा हा आविष्कार...

साईबाबांच्या भक्तांसाठी शिर्डीत पालखीभवन बांधायची आमची इच्छा होती. त्यासाठी शिर्डीत जागा मिळाली की आम्ही तुझ्या दर्शनाला येऊ असा नवस आम्ही येरमाळ्याच्या येडेश्वरी देवीला बोललो होतो. पालखीभवनासाठी जागा मिळाली म्हणून आम्ही नवस फेडायला येरमाळ्याला गेलो. पूजा झाल्यानंतर तिथल्या सभामंडपात बसलो असताना तिथल्या बाबांच्या फोटोने आमचं लक्ष वेधून घेतलं. तो फोटो म्हणजे एक लग्नपत्रिका होती. त्यावर लिहिलं होतं, 'तो जे करील तेच होईल, मार्ग तयाचा तोच दावील'. बाबांनीच आमच्याकडून नवस पूर्ण करून घेतला अशी भावना आमच्या मनात निर्माण झाली.

आम्ही सर्व पुणेकर साईभक्त तिरुपती बालाजी, श्री क्षेत्र तुळजापूर तुळजाभवानी आणि श्री येडेश्वरी देवी यांच्या दर्शनासाठी मंगळवार दिनांक १० मार्च २०20 ला निघालो.

पुणे ते श्री क्षेत्र शिर्डी असा पायी पालखी सोहळा गुरुपौर्णिमेनिमित्त गेले ३१ वर्षं होत आहे. तरी पुणेकर साईभक्तांची खूप वर्षांपासून असणारी एक ईच्छा म्हणजेच श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा पालखीभवन उभारण्यात यावे. खूप वर्षांपासून असणारी ही ईच्छा साईनाथांनी २०१९ मध्ये पूर्ण करून घेतली.

श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे ही प्रतिवर्षी अनेक सामाजिक उपक्रम राबवीत असते. २०१७ च्या दिवाळीदरम्यान पालखी सोहळ्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील एका गावामध्ये असणाऱ्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला आणि दुष्काळग्रस्त लोकांना




मदत केली; आणि त्यादरम्यान त्या भागात असलेल्या श्री येडेश्वरीदेवीच दर्शन घेण्यास पालखी सोहळ्याचे विश्वस्त गेले होते. सदर मंदिरातील गुरवांनी सांगितल्याप्रमाणे त्या देवीस पालखी सोहळ्याचे अध्यक्ष साईभक्त शामराव वीर यांनी देवीला कौल लावला होता की आमची श्री क्षेत्र शिर्डी येथे पालखी सोहळ्याची जागा झाली की आम्ही सर्व साईभक्त तुमच्या दर्शनाला येऊ.

आम्ही सर्व साईभक्त हा नवस फेडण्याकरिता श्री बालाजी, श्री तुळजाभवानी देवीला गेलो असताना मनसोक्त दर्शनाचा लाभ झाला. तेथून आम्ही पुढे येरमळ्याला श्री येडेश्वरी देवीच्या दर्शनाला गेलो आणि तेथे ही देवीने आम्हास मनसोक्त दर्शन दिले व पालखी सोहळ्याकडून देवीस साडी–चोळी अर्पण करून देवीची आरती करण्यात आली. अशाप्रकारे पालखी सोहळ्यातील विश्वस्त मंडळींकडून नवस पूर्ण करण्यात आला. पुढे सर्व भक्तमंडळी सभामंडपात नवस पूर्ण झाल्याच्या आनंदात गप्पागोष्टी करत बसली असताना सहज माझ्या नजरेस सभामंडपातील खांबावरील एका कोनाड्यात श्री साईनाथांची तसबीर नजरेस पडली आणि आमच्या सर्व भक्तमंडळींत अशी चर्चा झाली की श्री साईनाथांनी ते दर्शन देऊन आपला

केलेला नवस पूर्ण करून घेतला. आमच्यातील एका भक्ताने ती साईनाथांची तसबीर जवळून पाहण्यास घेतली असता ती तसबीर नसून एका साईभक्ताची लग्नपत्रिका! तो साईभक्तही श्री क्षेत्र शिर्डीचा होता हे आम्हाला पत्रिकेतील मजकुरावरून समजले. त्या पत्रिकेवर खालील ओवी होत्या,

**तो जे करील तेच होईल ।**
**मार्ग तयाचा तोच दावील ।**
**क्षण न लागता वेळ येईल ।**
**मुराद पुरेल मनाची ।।**
– श्री साईसच्चरित (अध्याय १९)

वरील ओवी वाचल्यावर आमच्या सर्वांच्या अंगावर शहारे आले व श्री साईनाथांच्या लीलांचा अवर्णनीय साक्षात्कार आम्हाला झाला. या ओवीनुसार बाबा म्हणतात की, तू एक पाऊल पुढे टाक, तुझ्याआधी मी शंभर पाऊले आलो असेन.

त्यानुसार या पत्रिकेतील ओवीचा अर्थ आम्हाला समजला की, ती वास्तू व्हावी अशीच श्री साईनाथांची इच्छा आहे. यानुसार बाबांनी त्यांना जे हवे तेच आमच्याकडून करून घेतले आणि पुढील मार्गही त्यांनीच दाखवला आणि आपल्या सर्व साईभक्तांची इच्छा श्री साईनाथ लवकरच पूर्ण करतील हा आशेचा किरण दाखवला. क्षणोक्षणी साईनाथ आपल्या लीलेचे अनुभव दाखवत असतात. आपण ते अनुभवून आपले पुढील कार्य चालू ठेवायचे असते. तसेच श्री साईनाथमहाराज आपले श्री क्षेत्र शिर्डी येथील श्री साईबाबा पालखी भवन आपल्या सेवेत लवकरच रुजू करून देतील.

**साईंच्या इच्छेने होतें अवघे काही ।**
**गणूकडे नाही बोल त्याचा।। २५।।**

असे अभंगात म्हटले आहे त्याचा प्रत्यय आला.

■■■

# बाबांनी व्रत चुकू दिले नाही

साईबाबांसाठी आई नऊ गुरुवारचं व्रत श्रध्देनं करायची. त्या प्रत्येक गुरुवारी ती पोथी वाचायची आणि सायंकाळी बाबांच्या आवडीचे पेरू त्यांना अर्पण करायची. एका गुरुवारी आम्हाला पेरू मिळालेच नाहीत. आम्ही गावभर शोधलं, पण कुठेच पेरू नव्हते. शेवटी संध्याकाळी थोडं निराश होऊनच आईने पूजेची तयारी सुरू केली. 'बाबा, आजची पूजा अशीच स्वीकारा' असं ती मनोमन विनवित होती. एवढ्यात हातात पेरूचं टोपलं घेऊन एक अनोळखी मुलगा दारात आला. इथून सहज चाललो होतो, तुम्हाला पेरू हवे असतील असं वाटल्यामुळे इथं आलो' असं तो म्हणाला..... आमचे डोळे अक्षरशः भरून आले.



**पद्मा कामत**
पंचवाडी, गोवा

जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव ।

हे आरतीचे बोल कानी पडले व ते मनाला अगदी स्पर्श करून गेले. साईबाबा आपल्या भक्तांना कुठल्याही कठीण प्रसंगाला न घाबरता तोंड द्यायला धीर देतात. साईबाबांची भक्ती करणे म्हणजे त्यांच्या 'श्रद्धा आणि सबुरी' मार्गावर चालणे.

माझ्या आईला साईबाबांचे नऊ गुरुवारचे व्रत करताना आलेला बाबांचा अनुभव मी लिहीत आहे. आई बँकेमध्ये काम करते व तिथे एका बाईने आईला साईबाबांचे नऊ गुरुवारच्या व्रताचे पुस्तक दिले. साईबाबा म्हणायचे की देवाची भक्ती करताना आपली साधना वाढवण्यापेक्षा, उपवास न करता आपली श्रद्धा व प्रेम वाढवले पाहिजे. हृदयातून सर्वांप्रती प्रेम प्रकट झाले पाहिजे. हे नऊ गुरुवारचे व्रत अगदी सोपे आहे. त्यामुळेच आईने ते करण्याचा निश्चय केला होता.

आईने हे नऊ गुरुवारचे व्रत चार वेळा केले आहे व दर वेळी साईबाबांच्या कृपेचा अदभुत अनुभव आम्हाला आला आहे. हे व्रत करताना साईबाबांची ममतेची सावली आहे ही जाणीव येते व त्यामुळे मी आईला हे व्रत परत करायला सांगितले होते. नऊ गुरुवारचे व्रत करताना दर गुरुवारी आई सकाळी बाबांची पूजा करून संध्याकाळी पोथी वाचायची व आम्ही साईबाबांचे आवडते पेरू घेऊन दर्शनासाठी जवळच्या साई मंदिरात जात होतो. संध्याकाळी देवघरात धूप दाखवून मोठ्या उत्साहात माझी आई, वडील, मी व माझी बहीण आम्ही आरती म्हणत असू.

ह्या दिवसांत प्रत्येक आठवड्यात आम्ही गुरुवारची वाट पाहत होतो;

कारण बाबांची आरती व सेवा करण्यात जो आनंद आहे तो अवर्णनीय आहे. असेच सात गुरुवार झाले व करोनाच्या महामारीमुळे देशात सरकारने लॉकडाऊन केले. आठव्या गुरुवारी आईला साईबाबांना पेरू ठेवायचे होते; पण सगळा बाजार बंद असल्याने पेरू किंवा इतर कसलेच फळ मिळाले नाही. मात्र आई निराश झाली नाही. तिने साईबाबांची प्रार्थना केली व आम्हाला म्हणाली, साईबाबा सर्व कर्ताकरविता आहेत व त्यांच्या मनात जे आहे तसेच होईल. जर काही फळ मिळालं नाही तर आपण साखरच ठेवू असं ठरलं होत. संध्याकाळी देवघरात पूजेची तयारी चालू असताना दरवाज्यावर घंटा वाजली. वडिलांनी दार उघडलं तर एक मुलगा हातात दोन पेरू घेऊन उभा होता. त्याने वडिलांना पेरू आईला देण्यास सांगितले. पेरू पाहताच आईला तसेच आम्हा सर्वांना फार आनंद झाला. आईने त्याला पेरू आणण्याचं कारण विचारलं. तर तो मुलगा म्हणाला की मी थोडे पेरू काढले होते व इकडूनच जात होतो तर तुम्हाला देण्याचा विचार मनात आला. आईने त्याला आपल्या गुरुवारच्या व्रताबद्दल सांगितलं व साईबाबां पेरू आवडतात म्हणूनच त्यांनी पेरू तुझ्याकडून पाठवून दिल्याचं सांगताच तो खुश झाला. आई म्हणाली, साईबाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवली तर बाबा आपल्या भक्ताच्या हाकेला धावून येतातच.

नवव्या गुरुवारी रामनवमी होती व गोव्यामध्ये थोडा बाजार चालू असल्याने आम्हाला अन्य सर्व फळे उपलब्ध होती, पण पेरू बाजारात नव्हते. त्या दिवशी पण संध्याकाळी तो मुलगा पेरू घेऊन आला व म्हणाला, पेरू आणले आहेत आज गुरुवार आहे व रामनवमीपण आहे. आम्हाला त्या मुलाचे नवलच वाटले. करोना महामारीच्या संकटाच्या प्रसंगातसुद्धा साईबाबा आपल्या भक्तांना धीर आणि आत्मविश्वास देतात. 'साईनाथ तेरे हजारो हाथ' ह्या गीताच्या बोलाप्रमाणे साईबाबा कुठल्याही रूपात येऊन आपल्या भक्तांना दिलासा देतात.

साईबाबांवर विश्वास ठेऊन प्रयत्न केल्यास, बाबा आपल्याला योग्य तोच मार्ग दाखवून यश मिळवून देतात. साईबाबांनी सांगितलं आहे, माझ्या सहवासात रहा, आणि शांत रहा, मी सर्व ठीक करीन. ह्या व्रतातून आम्हाला असा अनुभव आला की कितीही कठीण प्रसंग आला तरी साईबाबांवर श्रद्धा ठेऊन कर्तव्य केल्यावर बाबा भक्ताच्या भावनेप्रमाणे अनुभव देतात. आपणही प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहा..!!

## साईलीला - नवे रूप, नवे उपक्रम

**'साईलीला'चा हा बदललेल्या रूपातील अंक तुम्हाला नक्कीच आवडेल. 'साईलीला'ची परंपरा सांभाळत हा अंक अधिक आकर्षक, देखणा आणि कालानुवर्ती करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. दर्जेदार मजकुराबरोबरच नेत्रसुखद मांडणी हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. हा अंक अधिक परिपूर्ण होण्यासाठी आपला सहभाग केवळ आवश्यकच नव्हे, तर अनिवार्य आहे. या अंकासाठी आपल्या लेखनसहकार्याचे नेहमीच स्वागत होईल. अंकाच्या लौकिकाला साजेसे, वैचारिक, चिंतनशील लिखाण आम्हाला हवे आहे. काव्यातून आपल्या भावना मांडू इच्छिणाऱ्या वाचकांसाठी 'काव्यसरिता' हे नवे सदर आम्ही सुरू केले आहे. वाचकांसाठी 'साई प्रश्नमंजुषा' हे एक अभिनव सदर आम्ही सुरू करत आहोत.**

**कोणताही अंक हा वाचकांबरोबरचा संवाद असतो. तुमच्या सहभागाशिवाय तो पूर्ण होणार नाही. म्हणून या अंकासाठी आपण वेळोवेळी लिखाण करावे, ही विनंती आहे. आपला लेख / कविता / अनुभव किंवा प्रतिक्रिया 'साईलीला'कडे अवश्य पाठवा. आम्ही त्यांना योग्य प्रसिद्धी देऊ.**

**संपर्क पत्ता : 'साईनिकेतन', ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४.**

**दूरध्वनी : (०२२) २४१६६५५६, फॅक्स : (०२२) २४१५०७९. ई–मेल : saidadar@sai.org.in**

**भगवान दातार, ई–मेल : editor.saileela@gmail.com**

**– कार्यकारी संपादक**

# श्री रामनवमी उत्सव २०२०

श्री रामनवमी उत्सव बाबांच्या अवतारापासून म्हणजेच १९११ सालापासून सुरू आहे. तेव्हापासून रामनवमीयात्रा अखंडपणे सुरु होती. मात्र या वर्षी बुधवार दिनांक १ एप्रिल २०२० ते शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२० या काळात श्री रामनवमी उत्सव आला असताना संपूर्ण जगभरात व देशभरात करोना व्हायरसने थैमान घातले. या कोरोना व्हायरसच्या संकटामुळे भारत सरकार व राज्य शासनाच्या वतीने लॉकडाऊन करण्यात आले. तसेच कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना केल्या होत्या. यामध्ये धार्मिक स्थळे, सामाजिक ठिकाणी गर्दी होऊ नये अथवा करु नये असे निर्देश देण्यात आलेले होते. त्याच पार्श्वभूमीवर दिनांक १७ मार्च २०२० पासून श्री साईबाबा समाधी मंदिर भाविकांना दर्शनाकरिता बंद ठेवण्यांचा निर्णय संस्थानच्या तदर्थ समितीच्या वतीने घेण्यात आला. मात्र मंदिरातील दैनंदिन धार्मिक कार्यक्रम नेहमीप्रमाणे सुरू ठेवण्यांत आले. तसेच १०८ वर्षांपासून नियमित सुरू असलेल्या रामनवमीयात्रा रद्द करण्यांचाही निर्णय घेण्यात आला. श्री रामनवमी उत्सवाची परंपरा लक्षात घेवून मंदिरातील उत्सव कालावधीतील धार्मिक कार्यक्रम खंडित होवू नये म्हणून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते भाविकांविना साध्या पद्धतीने सर्व कार्यक्रम करण्यात आले.

उत्सवाच्या प्रथम दिवशी बुधवार दिनांक १ एप्रिल रोजी पहाटे ४.३० वाजता काकड आरती झाली. काकड



मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण डोंगरे व त्यांची पत्नी सौ. अंजली डोंगरे यांच्या शुभहस्ते व्दारकामाई मंदिरातील गव्हाच्या पोत्याची पुजा करण्यात आली.

आरतीनंतर साईबाबांच्या प्रतिमेची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक व्दारकामाईपर्यंत काढण्यात आली. या मिरवणुकीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी वीणा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांनी पोथी, प्रशासकीय अधिकारी श्री. दिलीप उगले व वैद्यकीय संचालक डॉ. विजय नरोडे यांनी श्रींची प्रतिमा घेवून मिरवणुकीत सहभाग घेतला. मिरवणूक व्दारकामाईत

**प्रतिनिधी**

आल्यानंतर श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी पहिला अध्याय, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांनी दुसरा अध्याय, उपमुख्यअभियंता श्री. रघुनाथ आहेर यांनी तिसरा अध्याय, वैद्यकीय संचालक डॉ. विजय नरोडे यांनी चौथा अध्याय व पोलीस उपनिरीक्षक मधुकर गंगावणे यांनी पाचव्या अध्यायाचे वाचन केले. सकाळी ५.३० वाजता श्रींचे मंगलस्नान व शिर्डी माझे पंढरपूर आरती करण्यात आली. सकाळी ६.१५ वाजता श्री साईबाबा समाधी मंदिरात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे व त्यांची पत्नी सौ. अंजली डोंगरे यांच्या शुभहस्ते श्रींची विधिवत पाद्यपूजा करण्यात आली. दुपारी १२.०० वाजता श्रींची माध्यान्ह आरती करण्यात आली. सायंकाळी ६.०० वाजता धूपारती झाली. रात्रौ १०.३० वाजता श्रींची शेजारती झाली.

उत्सवाच्या मुख्य दिवशी गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी पहाटे ४.३० वाजता श्रींची काकड आरती करण्यात आली. त्यानंतर अखंड पारायणाची समाप्ती झाली. श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची व्दारकामाईतून गुरुस्थानमार्गे मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणूकीत संस्थानचे मुख्य कार्यकारी

अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी वीणा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांनी पोथी, प्रशासकीय अधिकारी डॉ. आकाश किसवे व प्रशासकीय अधिकारी श्री. अशोक औटी यांनी श्रींची प्रतिमा घेवून मिरवणूकीत सहभाग घेतला. सकाळी ५.३० वाजता श्रींचे मंगलस्नान व शिर्डी माझे पंढरपूर आरती करण्यात आली. सकाळी ६.१५ वाजता श्री साईबाबा समाधी मंदिरात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे व त्यांची पत्नी सौ. अंजली डोंगरे यांच्या शुभहस्ते श्रींची विधिवत पाद्यपूजा व व्दारकामाई मंदिरातील गव्हाच्या पोत्याची पूजा करण्यात आली. सकाळी ६.४५ वाजता लेंडीबागेत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्या हस्ते शताब्दी ध्वज बदलण्यात आला. यावेळी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे उपस्थित होते. सकाळी १०.०० वाजता मंदिर कर्मचारी संभाजी तुरकणे यांचे श्री रामजन्मावर कीर्तन झाले. दुपारी १२.१५ वाजता श्रींची माध्यान्ह आरती झाली. दुपारी ४.०० वाजता मंदिर कर्मचाऱ्यांच्या हस्ते व्दारकामाई मंदिरावरील निशाणे बदलण्यात आले. सायंकाळी ६.०० वाजता श्रींची धूपारती करण्यात आली. रात्रौ १०.३० वाजता श्रींची शेजारती करण्यात आली.



**श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी पहिल्या अध्यायाचे वाचन केले.**

उत्सवाच्या सांगता दिनी शुक्रवार दिनांक ३ एप्रिल रोजी पहाटे ४.३० वाजता श्रींची काकड आरती करण्यात आली. सकाळी ५.३० वाजता श्रींचे मंगलस्नान व शिर्डी माझे पंढरपूर आरती करण्यात आली. सकाळी ६.१५ वाजता संस्थानचे प्रशासकीय अधिकारी सूर्यभान गमे व त्यांची पत्नी सौ. शोभाताई गमे यांच्या शुभ हस्ते समाधी मंदिरात श्रींची पाद्यपूजा करण्यात आली. सकाळी ७.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे व त्यांची पत्नी सौ. अंजली डोंगरे यांच्या शुभ हस्ते श्री. गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक करण्यात आला. सकाळी १०.०० वा. मंदिर पुजारी उल्हास वाळुंजकर यांचे काल्याचे कीर्तन होवून दहीहंडी कार्यक्रम झाला. दुपारी १२.१५ वाजता श्रींची माध्यान्ह आरती झाली. सायंकाळी ५.४५ वाजता समाधी मंदिरात जनसंपर्क अधिकारी मोहन यादव व त्यांची पत्नी सौ. सुरेखा यादव यांच्या शुभ हस्ते श्रींची पाद्यपूजा करण्यात आली. सायंकाळी ६.३० वाजता श्रींची धुपारती झाली. तर रात्रौ १०.३० वाजता श्रींची शेजारती झाली.


करोना व्हायरसच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबरोबरच लॉकडानच्या काळात श्रीरामनवमी उत्सव साध्या पध्दतीने यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, सर्व प्रशासकीय अधिकारी, मंदिर विभाग प्रमुख रमेश चौधरी, सर्व विभागांचे प्रमुख व कर्मचारीवृंदाने विशेष परिश्रम घेतले.



**मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांनी वीणा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांनी पोथी घेवून मिरवणुकीत सहभाग घेतला.**

# गुरुवीण कोण दाखवील वाट?

शिर्डीत दिनांक ४ जुलै २०२० ते दिनांक ६ जुलै २०२० याकाळात गुरुपौर्णिमा उत्सव करोनाच्या पार्श्वभूमीवर साध्या पध्दतीने साजरा झाला. श्री साईबाबांना देश-विदेशातील लाखो साईभक्त गुरु मानतात. त्या निमित्ताने श्री साईबाबा आणि श्री गुरुपौर्णिमा यांची महती सांगणारा विशेष लेख.



श्री साईसच्चरित्रतच्या १७ व्या. अध्यायात हेमाडपंतांनी गुरुचे महत्व विशद केलेले आहे. नित्य उत्तम शास्त्रांचे श्रवण करावे, विश्वसपूर्वक सद्गुरुवचन पाळावे आणि सदा सावध राहून आपले ध्येय लक्षात ठेवावे. शास्त्रांनी व गुरुंनी सांगितलेली आचारपध्दती लक्षात ठेवून लोक आपल्या उद्धाराचा मार्ग निवडतात. त्यांच्या उपदेशाने असंख्यं लोकांचा उद्धार होतो आणि त्यांचा मोक्षाचा मार्ग सुलभ होतो.

**नूलकरांचे निमित्त-गुरुपौर्णिमेस प्रारंभ**

श्री साईबाबांचे निस्सिम भक्त तात्यासाहेब नूलकर हे त्यांची आई व सासू यांना घेऊन शिर्डीत आले होते. त्याच दरम्यान गुरुपौर्णिमा असल्याने तात्यासाहेब नूलकरांनी पौर्णिमेच्या दिवशी बाबांची गुरु म्हणून पूजा केली. पूजा करुन तात्यासाहेब नूलकर निघून गेल्यानंतर बाबांनी तात्या पाटील कोते यांना बोलावणे पाठविले. बाबांचे बोलावणे आले त्या वेळी तात्या पाटील कोते हे आपल्या शेतावर काम करत होते. बाबांचे बोलवणे आल्यानंतर लगेचच ते बाबांकडे आले. त्यावेळी बाबा तात्या पाटील कोतेंना म्हणाले, तो का एकटा माझी पूजा करतो, तुला करायला काय झाले?' भक्तांच्या मनात इच्छा असूनही बाबा रागावतील म्हणून त्यांची गुरु म्हणून पूजा करण्याचे धाडस कोणी

**मोहन यादव**

दाखवत नसे.परंतु आता बाबांनीच अप्रत्यक्ष संमती दिल्याने तात्या पाटील कोते व तेथे उपस्थित असलेले माधवराव देशपांडे वगैरे भक्तांना खूप आनंद झाला. तद्नंतर दादा केळकर ज्येष्ठ असल्याने त्यांना गुरुपौर्णिमेच्या दिवशी बाबांची गुरु म्हणून पूजा करण्याचा मान देण्यात आला. त्यानी व्दारकामाईत जाऊन गंध, अक्षदा, हार, फुले, धोतरजोडी घेऊन जाऊन बाबांची यथाविधी पूजा केली. तेंव्हा पासून साईभक्त गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करु लागले.

**गुरु ज्ञानसागारु**

श्री साईचरिताच्या १७ व्या अध्ययात हेमाडपंतांनी गुरुचे महत्व विशद केलेले आहे. नित्य उत्तम शास्त्रांचे श्रवण करावे, विश्वसपूर्वक सद्गुरुवचन पाळावे आणि सदा सावध राहून आपले ध्येय लक्षात ठेवावे. शास्त्रांनी व गुरुंनी सांगितलेली आचारपध्दती लक्षात ठेवून लोक आपल्या उद्धाराचा मार्ग

निवडतात. त्यांच्या उपदेशाने असंख्यं लोकांचा उद्धार होतो आणि त्यांचा मोक्षाचा मार्ग सुलभ होतो. भक्ती व श्रध्दायुक्त मनाने, पूर्ण नम्रतेने साष्टांग नमस्कार करुन गुरुला शरण गेल्यशिवाय तो शिष्याला ज्ञानाचा ठेवा देत नाही. गुरुला सर्वस्व अर्पण करुन त्यांची सेवा करावी, बंध व मोक्ष या गोष्टी स्पष्ट करुन घ्याव्यात, विद्या व अविद्या याबद्दल त्यांना प्रश्न, करावे, म्हणजे गुरु महाराजांकडून उत्तम फळ मिळते. आत्मा कोण, परमात्मा कोण हे गुरु शिवाय कोणालाही सांगता येणार नाही. गुरु देखील शिष्य पूर्णपणे शरण आल्या. शिवाय ज्ञानाचा एक कणही देत नसतो. गुरुशिवाय इतर कोणी ज्ञान दिले, तर ते संसारातून पूर्ण सुटका करणारे नसते, मोक्षाचे फळ देणारे नसते आणि कधीही मनात ठसणारे नसते. म्हणूनच गुरुविना ज्ञान नाही, हे सर्वजन जाणतात. ब्रह्मा व आत्मा यांच्या ऐक्या ची सोय करायला गुरुचेच पाय समर्थ आहेत. ते आढेवेढे न घेता, ताठा अभिमान टाकून, जमिनीवर दंडाप्रमाणे सरळ लोटांगण घालून गुरुच्या चरणी मान वाकवा आणि मनाचा निश्चय पक्का करुन, गुरुचे पाय धरुन तोंडाने म्हणा, मी तुमचा दासानुदास आहे आणि मला तुमच्याच पायांचा भरवसा आहे. मग पहा त्या गुरुचा चमत्कार! तो गुरुरुपी दयेचा सागर डोलायला लागेल आणि आपल्या लाटांच्या शय्येवर तुम्हाला वरच्यावर झेलील. आपला अभय हस्त तुमच्या डोक्यावर ठेवून इडापिडांना उद्ध्स्त करील आणि मस्तकाला उदी लावून पापाच्या सर्व राशी जाळून टाकील.

**साईनाथ गुरु माझे आई**

हेमाडपंतांनी साईसचरिताच्या १८ व्या अध्यायात म्हटले आहे की, साईबाबा अगदी थोडासुध्दा राग – लोभ न करता ज्याचा जसा अधिकार असेल तसाच त्याला खऱ्याखुऱ्या मार्गाचा उपदेश करतात. कित्येकांचे असे मत आहे की, गुरुने सांगितलेले दुसऱ्या कोणाला सांगितले, तर ते विफल होते, परंतु हे केवळ काल्पनिक व आर्थाशिवायचे उगाचच ढोंग आहे. प्रत्यक्षच काय, स्वप्नात सांगितलेला देखील चांगला उपदेश सगळ्यांना सांगितला पाहिजे. याला काही आधार किंवा पुरावा नाही असे म्हणाल तर बुधकौशिक ऋषींचा आधार आहे. त्यांनी स्वप्नात दिक्षा रुपात प्राप्त. झालेले रामरक्षा स्तोत्र' सर्वांना कथन केले आहे. सद्गुरु हे वर्षा ऋतुतील मेघ आहेत. मोठया कौतुकाने ते स्वानंदरुपी पाण्याचा वर्षाव करतात. ते काय कोंबून ठेवण्यासाठी! स्वतः मनसोक्त पिऊन सर्वांना पाजावे. लेकराची हनुवटी धरुन त्याच्या आरोग्यासाठी माता जशी त्याला मायाळूपणे औषधाची गुटी पाजते तसेच बाबांचे हस्त कौशल्य होते. उपदेश करण्याचा त्यांचा मार्ग गुप्त नव्हता. आपल्या भक्तांचा हेतू कोणत्याही रितीने ते पुरवित असत.

सद्‌गरुचा सहवास धन्य होय. त्याचे महत्व कोण वर्णन करुन शकेल? सद्गुरुचे एकेक बोल आठवले की, आपली ते वर्णन करण्याची स्फूर्ती उचंबळून येते. ईश्वराची भक्तीभावाने स्तुती, पूजा केली असता आणि गुरुची सेवा व पूजा केली असता गुरु कडून ज्ञान प्राप्त होते, इतर साधने फुकट जातात. विक्षेप व आवरण यांच्यामुळे संसाराचा मार्ग अंधूक झालेला असतो. गुरुच्या उपदेशरुपी दिव्याचे किरण अडथळ्याशिवाया मार्ग दाखवितात. गुरु प्रत्यक्ष ईश्वर आहे, ब्रह्मा, विष्णू व महेश्वर आहे. गुरुच वास्तविक परमेश्वर व परात्पर ब्रह्म आहे. म्हणूनच गुरुगीतेत, गुरुब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः। गुरुःसाक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम:। असे म्हटलेले आहे. गुरु माता आहे व पिताही आहे. देव रागावला, तर गुरु वाचवितो, परंतु गुरु रागवला, तर कोणीही वाचवू शकत नाही. हे सदासर्वदा जाणावे. गुरु प्रवृत्तीचा (प्रापंचिक व्यवहाराचा) मार्ग दाखविणारा, पुण्यक्षेत्रे व व्रते यांची माहिती सांगणारा, तसेच निवृत्ती, धर्म, अधर्म, विरक्ती यांच्याबद्दल तसेच वेद व श्रुती बदल व्याख्यान करणारा आहे.

**बाबांचं गुरुस्थान ....गुरुस्थानी बाबा**

श्री साईबाबा शिर्डीस प्रथम दृष्टीस पडले ते निंबवृक्षातळी. त्या ठिकाणी ते ध्यान लावून आसनस्थ बसत असत. हे स्थान आपल्या गुरुचे असून ते आपल्याला अत्यंत प्रिय आहे. असे बाबा म्हणत असत. गुरुवारी व शुक्रवारी सूर्यास्ताच्या वेळी येथील जागा सारवून, क्षणभर का होईना, जो येथे उद जाळील त्याला सुख प्राप्ती होईल, अशी महती या स्थानाची बाबांनी सांगितली. येता–जाता ते त्या ठिकाणी नतमस्तक होत असत. श्रीसाईंनी गुरुमहात्म्य अपरंपार वर्णन केले, त्यांनी स्वतः गुरु म्हणून कोणाला उपदेश केला नाही. तरी देखील त्यांच्या मुखातून निघालेलेल्या सहज उद्गाराने हळु–हळु अनेकांच्या मनातील प्रश्नांतची उकल होत असे.

गुरुंची कपाळाला गंध लावून जशी पूजा केली जाते तशी आपली पूजा बाबा सुरुवातीच्या काळात कोणाला करु देत नसत. केवळ म्हाळसापतीच फक्त बाबांच्या कपाळाला गंध लावून त्यांची पूजा करत असत. इतर भक्त बाबांच्या पायांना गंध लावून पूजा करीत असत. बाबांच्या कपाळाला प्रथम गंध लावले ते नानासाहेब चांदोरकर यांच्या बापू नावाच्या मुलाने, त्यानंतर एकदा तात्या साहेब नूलकरांचे स्नेही डॉक्टर पंडीत बाबांच्या दर्शनाला आले. त्यांनी बाबांची मस्तक भरुन त्यावर गंधाच्या सुरेख

त्रिपुंड्र रेखाटला. हे अघटीत पाहून त्यांच्या समवेत असलेले दादा भट विस्मयांकीत झाले आणि आता बाबा कोपतील, असे त्यांना वाटले. पण तसे काही घडले नाही. त्याच दिवशी सायंकाळी या अघटिताबद्दल जाणून घेण्या विषयीची उत्सुकता दादांनी बाबांसमोर प्रगट केली. त्यावेळी त्या डॉक्टराने गुरु म्हणून माझी पूजा केली असे बाबांनी सांगितले.

**सच्चरितातलं गुरुमहात्म्य**

हेमाडपंतांनी साईच्चरिताच्या १८ व्या अध्यायाच्या शेवटी व १९ व्या अध्यायाच्या सुरुवातीस गुरुचे महत्त्व विशद करतांना राधाबाई नावाच्या एका वृद्ध महिलेची बाबांवर असलेली श्रध्दा व दृढ निश्चय याबाबतची आणखी एक गोष्ट वर्णन केलेली आहे. संगमनेरच्या खाशाबा देशमुखांची आई राधाबाई या साईबाबांची कीर्ती ऐकून एकदा शिर्डीला दर्शनासाठी आल्या होत्या. त्यांनी साईबाबांच्यां चरणी निष्ठा ठेवून दर्शन घेतले. दर्शन घेतल्यानंतर बाबांच्या चरणी त्यांचे प्रेम जडले आणि त्यांच्या मनात तीव्र इच्छा निर्माण झाली की साईसमर्थांना गुरु करावे. बाबांना गुरु केल्यानंतर ते योग्य उपदेश करतील आणि आपला परमार्थ साधला जाईल अशी राधाबाईंची इच्छा होती. राधाबाई वयाने म्हाताऱ्या होत्या. परंतु त्यांची बाबांवर अत्यंत निष्ठा होती. त्यामुळे बाबांकडून काहीतरी उपदेश घ्यावा असा त्यांनी मनात निश्चय केला. जोपर्यंत बाबा माझ्यावर कृपा करुन एखादा स्वतंत्र कानमंत्र मला देत नाहीत तोपर्यंत मी शिर्डी सोडून कुठेही जाणार नाही असे म्हणत तीन दिवस अन्नाचा एक कण व पाण्याचा एक थेंबही त्यांनी घेतला नाही. श्री साईबाबांच्या तोंडचा मंत्र घ्यायचा, इतर ठिकाणाचा घेतला तर तो पवित्र नव्हे. श्री साईबाबा पुण्यकारक महान संत आहेत. तेच माझ्यावर अनुग्रह करोत असा अंतःकरणात दृढ निश्चिय करुन राधाबाईंनी खाणेपीणे वर्ज्य केले आणि धरणे धरुन बसल्या.

राधाबाईंचा दृढ निश्चय पाहून बाबांनी त्यांच्यावर अनुग्रह केला. त्यांच्या मनाचा कल फिरविला. बाबांनी त्यांना प्रेमाने हाक मारुन म्हटले, आई! तु कां गे धरणे घेतलेस? मरण का तुला आवठले? जीवाचे हाल का करतेस? मी केवळ तुकडे मागणारा फकीर आहे. माझ्याकडे प्रेमाने पहा. खरेच मी लेक आहे आणि तू आई आहेस. आता माझ्याकडे लक्ष दे. तुला एक नवलाची गोष्ट सांगतो, जी तुला खूप सुख देईल पहा माझा गुरु मोठा अवलिया व कृपेचा सागर होता. त्याची सेवा करुन करुन मी थकलो. परंतु तो मला कानमंत्र देत नव्हता. माझ्या मनातही प्रबळ इच्छा होती की त्याची कास सोडू नये आणि त्यांच्या मुखाने मंत्र घ्यावा. सुरुवातीला त्याने मला लुबाडले. माझ्याकडून दोन पैसे मागितले. मी ते लगेच देवून टाकले आणि मंत्राच्या शब्दांसाठी खूप विनंती केली. माझा गुरु पूर्णकाम (ज्याच्या सर्व इच्छा आकांक्षा तृप्तच झालेल्या आहेत असा) होता. त्याला दोन पैशांचे काय काम? शिष्याकडून पैसे मागतो त्याला निष्काम कसे काय म्हणावे? परंतु अशी शंका मनात येऊ देवू नका. त्याला व्यावहारीक पैशाची इच्छाा स्वप्नातही नव्हती. पैशाशी त्याला काय कर्तव्य! निष्ठा व सबूरी हेच ते दोन पैसे होते. दुसरे नव्हते. मी ते लगेच देवून टाकले आणि त्यामुळे गुरुमाऊली माझ्यावर प्रसन्न झाली. धैर्य म्हणजेच सबूरी. तीला कधीही दूर सारु नकोस. प्रसंग केंव्हा ही व कसाही जड पडला, तरी हीच भवपार नेईल. पुरुषांचे पौरुषत्व म्हणजेच सबूरी. ती संताप व दिनता घालविते, युक्ती – प्रयुक्तीने संकटे निवारते आणि सर्व भिती बाजूला सारते. सबूरीच्या वाटेला यश येते आणि विपत्ती बारा दिशांना पळून जाते. येथे अविचाररुपी त्रासदायक गोष्टी कोणाला ठावून नसते. सबुरी ही सद्गुणांची खाण व सद्विचार रुपी राजाची राणी आहे. निष्ठा व सबूरी ह्या सख्या बहीणी असून एकमेकींना जीव की प्राण असतात. सबूरी शिवाय मनुष्यप्राण्याची स्थिती दिनवाणी होते. पंडीत असो वा मोठा गुणवान असो, हिच्या शिवाय त्याचे जीवन व्यर्थ असते.

गुरु जरी स्वतः समर्थ असला तरी शिष्याकडून त्याला तीव्र बुध्दीची, सबळ श्रध्देची व धैर्ययुक्ती सबूरीची अपेक्षा असते. दगड व हिरा हे दोन्ही सहाणेवर घासले, तर स्वच्छ होतात, परंतु दगड दगड रहातो आणि हिरा मात्र तेजाळ होतो. चमकण्यासाठी दोघांनीही एकच क्रिया केला, परंतु दगडाला हिऱ्याचे पाणी चढेल काय? हिऱ्याची तेजाळ हिरकणी बनेल आणि दगड आपल्या गुणासारखा गुळगुळीतच राहील.

**गुरुगृही साईनाथ**

बाबा म्हणाले, बारा वर्ष गुरुच्या पायाशी राहीलो आणि गुरुने मला लहानाचा मोठा केले. गुरुच्या पोटात अत्यंत प्रेम होते आणि मला अन्न–वस्त्राचा तोटा नव्हता. माझा गुरु भक्तीप्रेमाचा केवळ पुतळा होता. त्याला शिष्याचा खरा जिव्हाळा होता. माझ्या गुरु सारखा गुरु विरळाच आणि त्याच्या सहवासाच्या सुखाचे वर्णनच करता येत नाही. त्या. प्रेमाचे काय वर्णन करावे! त्याचे मुख पाहता माझे डोळे ध्यानस्थ होत असत. आम्ही दोघेही अति आनंदी असायचो आणि मला दुसरे काही पाहणेच नसायचे. मी रात्रंदिवस प्रेमाने गुरुमुखाचे अवलोकन करीत असे. मला ना भूक ना तहान.. गुरु शिवाय माझे मन अस्वस्थ होत असे. त्याच्या शिवाय दुसरे ध्यान मला नव्हते. त्याच्या शिवाय



माझे दुसरे लक्ष नव्हते. गुरु हेच एक माझे अनुसंधान होते. खरेच गुरुचे कौशल्य अजब असते.

माझ्या गुरुचीही हीच अपेक्षा होती. याशिवाय त्याची दुसरी काही इच्छा नव्हती. त्याने माझी कधी उपेक्षा केली नाही आणि माझे संकटापासून सदा रक्षण केले. कधी मी गुरुच्या पायापाशी होतो, तर कधी समुद्राच्या पैलतीरी होतो. परंतु त्याच्या सहवास सुखाला अंतरलो नव्हतो. तो मला कृपायुक्तस दृष्टीने सांभाळत होता. कासवी जशी आपल्या पिल्लांना स्वतःच्या दृष्टीने खाऊ घालते तशीच माझ्या गुरुची तऱ्हा होती. दृष्टीनेच तो लेकरांना (शिष्यांना) सांभाळत असे. आई! या मशिदीत बसून मी जे सांगतो ते खरे मान. गुरुने माझेच कान नाही फुंकले तर तुझे मी कसे फुंकू? कासवीच्या प्रेम दृष्टीनेच तिच्या पोरांना सुख-संतोष लाभतो. आई! उगाच कशाला दुःखी होतेस? मला उपदेश, गोष्टी ठाऊक नाहीत. कासवी नदीच्या एका किनारी व तिची पोरे पलीकडच्या वाळवंटावर असतांना दृष्टादृष्टीनेच त्यांचे पालन-पोषण होते. म्हणून म्हणतो मंत्राच्या व्यर्थ खटपटी कशासाठी पाहिजेत. तर आता तू जा व अन्न खा, जीव धोक्यात घालू नकोस. माझ्याकडे फक्त लक्ष दे, म्हणजे परमार्थ हातास येईल. तू माझ्याकडे अनन्य पणे पहा आणि मीही तुजकडे पाहीन, याशिवाय दुसरे काही माझ्या गुरुने मला शिकविलेच नाही. साधनसंपन्नतेची (ज्ञानप्राप्तीची चार साधने म्हणजे विवेक, वैराग्य, शमादि षडसंपती व मुमूक्षता मिळविण्याची) गरज नाही. सहा शास्त्रांच्या निपूणतेची जरुरी नाही फक्त एक पुरता विश्वास असावा की, गुरुची स्थिती जाणतो तो त्रैलोक्यात धन्य होय. अशा प्रकारे राधाबाईंना बाबांनी बोध केल्यावर ती गोष्ट त्यांच्य मनात ठसली आणि त्यांनी बाबांच्या चरणांवर मस्तक ठेवून आपले व्रत थांबविले.

**श्री साईबाबांची शिकवण**

परमेश्वर आहे, त्याच्यापेक्षा मोठा कोणीही नाही. तो सर्व चराचरामध्ये भरुन उरला आहे. त्याची लीला अगाध आहे. उत्पन्नही तोच करितो, राखतोही तोच, वाढवितोही तोच आणि मारितोही तोच, तो ठेवील तसे रहावे, त्याच्याच मर्जीत आपण राजी रहावे, तळमळ करु नये. त्याच्या इच्छेशिवाय झाडाचे पानही हालत नाही. प्रत्येकाने नेकीने (प्रामाणिकपणे, सचोटीने) वागावे. वादावादी करु नये. सदविवेक शक्ती जागृत ठेवावी. आपले कर्तव्य परमेश्वराला द्यावे आणि फलही त्यासच समर्पण करावे, म्हणजे आपण अलिप्त राहून कर्म आपल्याला बाधक होणार नाही.

सर्वांशी प्रेमाने वागावे, वादावादी करु नये. कोणी काही बोलले तर ऐकून घ्यावे. कोणाच्या बोलण्याने आपल्या अंगाला भोके पडत नाहीत कोणाची बरोबरी करु नये. कोणाची निंदा करु नये. कोणी काही केले तरी तिकडे लक्ष देऊ नये. त्याचे त्यांच्यासंगे, आपले आपल्यासंगे, कष्ट करीत असावे. रिकामे राहू नये. देवाचे नाव घ्यावे. पोथीपुराण वाचावे. आहार-विहार त्यागू नयेत, पण नियमित असावे.

एखाद्याचे वागणे निंद्यनिय वा ठपका ठेवण्यासारखे असेल, तर त्याची कीव जाणून त्याला आपल्यासमोरच शिकवणीच्या दोन गोष्टी सांगाव्यात. त्याच्यामागे त्याच्या वागण्याबद्दल टिका, उपहास किंवा चर्चा कधीही करु नये आणि असल्या चर्चेत भागही घेऊ नये. याबद्दल एका निंदकाला जमलेल्यां इतर भक्तांदेखत एका डुकरीकडे बोट दाखवून निर्भर्त्सना केली व त्यालाच काय, सर्व भक्तांनाच श्री साईबाबांनी बोध दिला.

**श्री साईबाबांच्या मुखातील वचनावली**

मी जरी गतप्राण झालो तरीही माझे वाक्य प्रमाणच माना. माझी हाडे देखील माझ्या तुर्बतीमधून तुम्हाला आश्वासन देतील. मी काय, पण माझी तुर्बतसुद्धा तुमच्याबरोबर बोलत राहील आणि तिला जो अनन्यपणे शरण जाईल त्याच्याबरोबर डोलतसुध्दा राहील. मी डोळ्याआड होईन याची चिंता करु नका, माझी हाडे बोलताना व तुमच्याशी कानगोष्टी करताना तुम्ही ऐकाल. मात्र माझे स्मरण करा, अंतःकरणात माझ्याबद्दल विश्वास ठेवा आणि निरिच्छपणे माझे भजन करा, म्हणजे आपले कल्याण साधलेले असेल.

तुम्ही कुठेही असा, काहीही करा, परंतु एवढे मात्र सदा लक्षात ठेवा की, तुमच्या कृतीच्या जशा घडल्या तशा खबरा मला सतत कळत असतात. असा जो माझ्याबद्दलचा अनुभव तुम्हाला येतो तो मी सर्वांच्या अगदी जवळचा, सर्वांचा हृदयात वास करणारा, सगळीकडे जावु शकणारा असून सर्वांचा स्वामी आहे. सर्व सजीव व निर्जीव सृष्टीला आत व बाहेर व्यापून मी बाकी उरलो आहे. ही सगळी ईश्वराने पूर्वी करुन ठेवलेली योजना आहे आणि त्याचा मुख्य चालक मीच आहे.

मी सगळ्या चराचर सृष्टीचा उत्पन्न. कर्ता आहे व तिन्ही (सत्व, रज व तम) गुणांची सारख्या प्रमाणाची अवस्था ही मीच आहे. मीच सर्व इंद्रियांना चालविणारा आहे आणि कर्ता, धर्ता व संहर्ताही मीच आहे. माझ्याकडे जो लक्ष लावतो त्याला कोणतेही संकट नसते, परंतु ज्याला माझा विसर पडतो त्याला माया चाबकाचे फटकारे मारते म्हणजे छळते. जे जे काही दिसते ते ते माझेच स्वरुप आहे. लहान किडा, मुंगी, रंक (दरिद्री) किंवा भूप (राजा) असो, हे मापता न येणारे स्थावर व जंगम विश्वत साईंचेच आपले रुप आहे.

■■■



करोना व्हायरसच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अरुण डोंगरे यांच्याकडे मंदिर विभागाचे वरिष्ठ पुजारी नारायण राजाराम भिसे यांनी २१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याकरिता सुपूर्द केला.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## * तदर्थ समिती *



**श्री. श्रीकांत अणेकर**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर



**श्री. अरुण डोंगरे** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी




**श्री. दिलीप स्वामी**
अप्पर महसूल विभागीय आयुक्त,
नाशिक



**सौ. गीता प्रवीण बनकर**
सहायक धर्मादाय आयुक्त,
अहमदनगर

RNI Regd. No. MAH/MAR/2001/10353




चोखट करूनि अंत:करण। भक्तिभावें करावें पारायण। एक, द्वि, वा त्र्यहनीं करावें पूर्ण। साईनारायण तोषेल।। अथवा करावा सप्ताह गोड। मिळेल पुण्यसंपत्तीची जोड। साई पुरवील मनींचें कोड। भवभय मोड होईल।। प्रारंभ करावा गरुवासरीं। उष:कालीं स्नानानंतरीं। बसावें आपुल्या आसनावरी। उरकूनि सत्त्वरी नित्यकर्म।। मंडप घालावा रम्य विस्तीर्ण। रंभा, कर्दळी, वसनादि करून। उपरी सुंदर आच्छादन। घालून विभूषित करावा।। त्यांत करावें उच्चासन। भोंवतीं काढाव्या भिन्न भिन्न। रंगवल्ल्या रंगपूर्ण। नयनसुभग असाव्या।। साईसद्गुरु–प्रतिमा करून। अथवा सुंदर छबी घेऊन। उच्चासनीं ठेवावी जपून। करूनि वंदन प्रेमभावें।। चीनांशुकीं ग्रंथ बांधोनि। सद्गुरुसन्निध त्या ठेवूनि। पंचोपचारें उभयतां पूजूनि। आरंभ वाचनीं करावा।। व्रतस्थ राहावें अष्ट वासर। करावा गोरस वा फलाहार। अथवा भर्जित धान्यप्रकार। नक्त रुचिर वा एकभुक्त।। प्राचीदिशीं मुख करून। सद्गुरुमूर्ती मनी आठवून। करावें स्वस्थ मनें करून। ग्रंथवाचन मोदभरें।। अष्ट, अष्ट आणिक सप्त। अष्ट, षट्, अष्ट, सप्त। एवं पाठ करावा दिन सप्त। अवतरणिका फक्त अष्टमाहनीं।। अष्टम दिनीं व्रतपारणा। करूनि नैवेद्य साईनारायणा। सुग्रास भोजन आप्तेष्ट–ब्राह्मणां। दक्षिणा यथाशक्ती त्यां द्यावी।। अवंतूनि वैदिक ब्राह्मणां। करावी निशी वेदघोषणा। पयशर्करापान संभावना। देऊनि तन्मना निववावें।। अंतीं वंदूनि सद्गुरुचरणां। अर्पावी त्या उचित दक्षिणा। धाडावी ती भांडारभुवना। संस्थाननिधिवर्धनाकारणें।। येणें तोषेल साईभगवान। देईल भक्ता पसायदान। छेदील भवभय–लेलिहान। दावील निधान मोक्षाचें।।

– श्री साईसच्चरित, अ. ५३, ओ. १८२–१९५

प्रकाशक व मुद्रक अरुण किशोर डोंगरे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक गणेश आर्ट प्रिंटर्स, एम.आर. ट्रेड सेंटर, शॉप नं. ७, वाडिया पार्क, अहमदनगर-४१४००१ येथे छापून साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.
संपादक : अरुण किशोर डोंगरे (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Printed and published by Arun Kishor Dongare (I.A.S.), Chief Executive Officer on behalf of the Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi and printed at Ganesh art Printers, MR Trade Centre, Shop No. 7, Wadiya Park, Ahmednagar-414001 and published from Sai Niketan, 804-B, Dr. Ambedkar Rd., Dadar, Mumbai – 400 014.
Editor : Arun Kishor Dongare (I.A.S.), Chief Executive Officer, Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.